# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# अधिसभेच्या १९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
# शनिवार, दि.२९ सप्टेंबर, २०१८ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची १९ वी बैठक दि.२९ सप्टेंबर, २०१८ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु तथा प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. उबाळे व्ही. पी. | सदस्य |
| ३) | प्राचार्या डॉ. श्रीमती पांडे के. ए. | सदस्या |
| ४) | प्राचार्य डॉ. कदम एम. एस. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | सदस्य |
| ६) | डॉ. शेवाळे बी. सी., वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ७) | प्रा. डॉ. घुटे व्ही. बी. | सदस्य |
| ८) | श्री. शिंदे एस. एन. | सदस्य |
| ९) | डॉ. पवार एस. के. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. चिट्टे जी. एन. | सदस्य |
| ११) | प्राचार्य डॉ. कोटी एस. व्ही. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. परिचारक डी. एस. | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| १४) | प्राचार्य डॉ. शिंगाडे ए. बी. | सदस्य |
| १५) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १६) | श्री. नवले एस. एस. | सदस्य |
| १७) | डॉ. रोंगे बी. पी. | सदस्य |
| १८) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| १९) | कु. मोहिते-पाटील एस. जे. | सदस्य |
| २०) | डॉ. आवताडे एच. के. | सदस्य |
| २१) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २२) | डॉ. बारबोले ए. एन. | सदस्य |
| २३) | डॉ. काळजे ए. एम. | सदस्य |
| २४) | डॉ. बिराजदार जी. डी. | सदस्य |
| २५) | डॉ. शिंदे टी. व्ही. | सदस्य |
| २६) | डॉ. आदटराव बी. एन. | सदस्य |
| २७) | डॉ. शिंदे एस. के. | सदस्य |
| २८) | डॉ. फुलारी टी. जे. | सदस्य |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| २९) | डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी. | सदस्या |
| ३०) | डॉ. मेंते आर. एस. | सदस्य |
| ३१) | डॉ. कांबळे जी. एस. | सदस्य |
| ३२) | श्रीमती चव्हाण ए. सी. | सदस्या |
| ३३) | श्री. साळुंके एस. एस. | सदस्य |
| ३४) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३५) | श्री. शेख ए. एम. | सदस्य |
| ३६) | श्री. गायकवाड एस. एम. | सदस्य |
| ३७) | श्री. सरवदे एस. टी. | सदस्य |
| ३८) | श्रीमती मंकणी एन. एस. | सदस्या |
| ३९) | श्रीमती नागणसुरे पी. आर. | सदस्या |
| ४०) | श्री. चव्हाण डी. ए. | सदस्य |
| ४१) | श्री. धरणे जी. आर. | सदस्य |
| ४२) | प्रा. डॉ. देशमुख एम. बी. | सदस्य |
| ४३) | श्रीमती महागांवकर आर. ए. | सदस्या |
| ४४) | श्री. पाटील एस. बी. | सदस्य |
| ४५) | श्री. हिरेमठ एस. बी. | सदस्य |
| ४६) | श्रीमती तडवळकर ए. ए. | सदस्या |
| ४७) | डॉ. चौधरी एस. बी. | सदस्य |
| ४८) | श्री. संगवे ए. बी. | सदस्य |
| ४९) | डॉ. मंझा जी. आर., कुलसचिव | सदस्य सचिव |

**स्वागत:**

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

श्री. एस. टी. सरवदे यांची महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळावर अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल अधिसभेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

**अनुपस्थिती :**

अधिसभेच्या या बैठकीस श्री. आवळे ए. के. व ॲड. कळके ए. एस. यांनी पत्राद्वारे व श्री. राणे जी. एफ. व श्री. डांगरे एम. एस. यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. डॉ. धामनस्कर आर. एस. विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी, डॉ. नंदनवार डी. आर. प्र. सहसंचालक, (तंत्र शिक्षण), मा. शिक्षण संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी, श्री. पाटील पी. टी., श्री. गावडे टी. जे., श्री. अनासपुरे एम. एम. व श्री. ठाकूर एस. एम. विधानपरिषद सदस्य हे अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा. कुलगुरुंना अधिसभेच्या अठराव्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

➢ **कुलसचिव कार्यालय:**

१) सोलापूर विद्यापीठामध्ये संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ हे पद भरण्यासाठी दि. २५/०८/२०१८ रोजी पात्र उमेदवारांच्या तज्ञ निवड समितीमार्फत मुलाखती घेण्यात आल्या.

२) प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी मे.गोदावरी एंटरप्रायजेस, नांदेड यांचेमार्फत Placement Officer, जनसंपर्क अधिकारी, अंतर्गत लेखा परीक्षक, प्रोगामर, वेबसाईट डेव्हलपर व टेक्नीकल असिस्टंट ही पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यात आली.

३) प्रस्तुत विद्यापीठास संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ हे पद भरण्यासाठी विविध वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन पात्र उमेदवारांकडून दि.१५/०९/२०१८ पर्यत अर्ज मागविण्यात आले आहेत.

४) विद्यापीठातील पदोन्नतीच्या रिक्त पदावर पदोन्नती देण्यासाठी सेवाजेष्ठता व गुणवत्तेनुसार वर्ग १ ते ४ संवर्गातील पात्र उमेदवारांची शिफारस करण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि.२०/०७/२०१८ व दि.२६/०७/२०१८ रोजी आयोजित करुन समितीच्या शिफारशीनुसार पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

५) कॅस अंतर्गत शिक्षकांच्या पदोन्नती करिता Selection Committee ची बैठक दि.२८/०६/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर कमिटीने शिफारस केल्यानुसार डॉ.लोखंडे बी.जे, डॉ.भोसले आर.बी, डॉ.कांबळे जी.एस. यांना सहयोगी प्राध्यापक पदावरुन प्राध्यापक पदावर पूर्वलक्षीप्रभावाने पदोन्नती आदेश दि.२५/०७/२०१८ रोजी पारित करण्यात आले. कै. डॉ. सी. एच. भानुमते प्रपाठक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदावर पदोन्नती.

६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या भाषा व वाङ्मय संकुल (मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत व उर्दू) व रसायनशास्त्र संकुलातील B.Tech in Cosmetic Technology येथे कंत्राटी सहायक प्राध्यापक पदाची एकूण ०६ नविन पदे निर्माण करुन Walk in Interview ची जाहिरात देवून दि.२८/०८/२०१८ रोजी उपस्थित उमेदवारांची मुलाखत घेऊन निवड समितीने एकूण ०५ उमेदवारांची शिफारस केली आहे. निवड झालेल्या उमेदवारांना कंत्राटी शिक्षक म्हणून नियुक्ती आदेश पारित करण्यात आले आहेत.

७) अभियांत्रिकी विभागांतर्गत होणारे कामे खालील प्रमाणे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (लाखात) | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालय इमारतीचे दुरुस्तीचे काम करणे | १९.९८ | काम अंतिम टप्प्यात आहे |
| २ | विद्यापीठातील वर्क स्टेशनसाठी लागणारे फर्निचर तयार करणे | ६२.३५ | अंतिम देयक आदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| ३ | १०० केव्हीए चा सोलर जनरेशन सिस्टीम बसविणे | ९८.५५ | काम पुर्ण झाले असून ७० % देयक आदा करण्यात आले आहे. |
| ४ | विद्यापीठातील ड्रेनेजचे काम करणे | २४.५० | सर्वक्षण, आराखडा तयार करणे इत्यादी कामासाठी २.०० लाख रुपये आगाऊ तसलमात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना देण्यात आलेली आहे. व सदर कामाचे अंदाजपत्रक करण्याची कार्यवाही त्यांचेमार्फत सुरु आहे. |
| ५ | विद्यापीठातील वेस्ट वॉटर ट्रिटमेंटचे काम करणे | ५०.०० | |
| ६ | विद्यापीठातील रेन वॉटर हार्वेस्टींगचे काम करणे | १०.०० | |
| ७ | मुलांचे वसतिगृह बांधणे | ७००.०० | अंदाजपत्रक सा.बॉ.विभागाकडून आदिवासी शासकीय वसतीगृह विभागाकडे सादर करण्यात आले आहे. |
| ८ | पदार्थ विज्ञान इमारतीचे दुरुस्तीचे काम करणे | १९.१२ | सदर काम अंतिम टप्प्यात आहे. |
| ९ | रसायनशास्त्र इमारतीचे दुरुस्तीचे काम करणे | १९.७३ | सदर काम अंतिम टप्प्यात आहे. |
| १० | विद्यापीठात दिक्षांत समारंभ करीता मल्टीपर्पज हॉल बांधणे | २३४.०० | अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ यांचेकडून तपासून अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. |
| ११ | इलेक्ट्रॉनिक्स इमारत बांधणे | २७०.०० | मुख्य अभियंता, पुणे यांच्याकडून जॉब नंबर प्राप्त करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| १२ | विद्यापीठाचे मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन बांधणे | ४१४१.०० | अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, पुणे सा.बां.विभागाकडुन तत्वत: तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. तसेच सदर कामाची ई निविदा प्रकाशीत करण्याची कार्यवाही करणेबाबत सा.बां.विभागास कळविण्यात आलेले आहे. |
| १३ | सामाजिकशास्त्रे संकुलाकडील सेमिनार हॉल व कॉन्फरन्स हॉलचे नुतनीकरणाचे काम करणे फेस-१ | २४.७७ | कार्यारंभ आदेश देण्यात आले ला आहे, काम सुरु करण्यात येत आहे. |
| १४ | सामाजिकशास्त्रे संकुलाकडील सेमिनार हॉल व कॉन्फरन्स हॉलचे नुतनीकरणाचे काम करणे फेस-२ (खुर्ची खरेदी करणे) | १३.४४ | कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. |

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (लाखात) | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १५ | भुशास्त्र संकुल इमारतीमध्ये परीक्षा हॉलचे बांधकाम करणे | १९.०२ | काम पुर्ण झालेले आहे. |
| १६ | शास्त्रीय उपकरण केंद्र इमारतीचे पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे | ३१.४० | आतील व बाहेरील प्लॅस्टर काम सुरु आहे. |
| १७ | मेस क्र. १ चे वाढीव बांधकाम करणे | ३८.१९ | काम अंतिम टप्यात आहे. |
| १८ | मेस क्र. २ चे वाढीव बांधकाम करणे | ३८.१९ | काम अंतिम टप्यात आहे. |
| १९ | ४०० मिटर ॲथेलेटीक ट्रॅक तयार करणे | ३५.०० | काम अंतिम टप्यात आहे. |
| २० | व्ही.आय.पी.अतिथीगृहाचे वाढीव बांधकाम करणे. | १८०.०० | सा.बां.विभागाकडून तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे, त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. |
| २१ | हेल्थ सेंटर इमारतीचे बांधकाम करणे | ३२.०० | वीट बांधकाम सुरु आहे. |
| २२ | फॅकल्टी क्लब इमारतीचे बांधकाम करणे | २०१.०० | सदर कामाच्या वाढीव / सुधारीत कामाची प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठीचा विषय दि.१२-६-१८ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीत ठेवण्यात आलेला होता, परंतु सदर विषय तपशीलवार पुढील बैठकीत ठेवण्याचा ठराव करण्यात आला. |
| २३ | मुलींचे वसतिगृह बांधणे | ७००.०० | अंदाजपत्रक सा. बां. विभागाकडून मंत्रालय आदिवासी शासकीय वसतीगृह विभागाकडे सादर करण्यात आले आहे. |
| २४ | संगणकशास्त्र संकुलामध्ये लिफ्ट बसविणेकरीता लागणारे बांधकाम करणे | १६.३३ | काम सुरु आहे. |
| २५ | संगणकशास्त्र संकुलामध्ये लिफ्ट बसविणे | २३.८२ | ई-निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| २६ | ४८२ एकर परिसरामध्ये सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे | ४१५.९८ | सा. बां. विभागाकडून अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे. तसेच सदर कामाची ई निविदा प्रकाशीत करण्याची कार्यवाही करणेबाबत सा. बां. विभागास कळविण्यात आलेले आहे. |
| २७ | विद्यापीठ परिसरातील उपहारगृह, मुलींची मेस, मुलांची मेस क्र. १ व २ या ११ महिन्यांकरीता चालविण्यास देणेबाबत. | ---- | उपहारगृह,मुलींची मेस, मुलांची मेस क्र. १ व २ या ११ महिन्याकरीता चालविण्यासाठी विविध फर्मना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. |

- **महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ:**

१) कौशल्य विकासकेंद्रातंर्गत सर्व अभ्यासक्रमाचे निकाल घोषित करण्यात आले असून सर्व महाविद्यालय/संस्थाना गुणपत्रक व प्रमाणपत्र पोहच करण्यात आले आहेत.

२) कौशल्य विकासकेंद्रांत्रर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी एकूण ४२ महाविद्यालय/संस्थांना विविध अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संलग्निकरण व नुतनीकरणास मान्यता देण्यात आली आहे.

३) कौशल्य विकासकेंद्रसाठी डॉ.प्रभाकर कोळेकर, सहा.प्राध्यापक,सामाजिक शास्त्रे संकुल यांची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

४) कौशल्य विकासकेंद्रातंर्गत विविध अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांची संपूर्ण माहिती तसेच विद्यार्थ्यांची माहिती सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्थेकडून मागविण्यात आली आहे.

५) कौशल्य विकासकेंद्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी एकूण ५८अभ्यासक्रम होते. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी एकूण ६ नविन अभ्यासक्रम महाविद्यालय/संस्थेत सुरू करण्यात आले आहेत. त्यानुसार एकूण ६४ अभ्यासक्रम झालेले आहेत.

६) सौ.संगिता जाधव सचिव, महाराष्ट्र कराटे ॲण्ड किक बॉक्सिंग फेडेरेशन,सोलापूर यांनी प्रस्तुत विद्यापीठातील कौशल्य विकासकेंद्रातंर्गत Moral Value Education व Self Defence हे दोन नविन अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रस्ताव दिलेला होता. त्याअनुसरून दोन्ही अभ्यासक्रमासाठी सामंजस्य करार (MOU) करण्याबाबत मा.कुलगुरू महोदयांनी सुचविले होते. दोन्ही अभ्यासक्रमाचे सामंजस्य करार (MOU) करण्यात आलेला असून अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेले आहेत.

७) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ वर्षासाठी अविष्कार संशोधन महोत्सव-२०१८ चे आयोजन करण्यात येत आहे. त्यासाठी डॉ.एस.डी राऊत संगणकशास्त्र यांची अविष्कार समन्वयकपदी नेमणूक करण्यात आली आहे. तसेच डॉ.एम.जी.माळी यांची सहसमन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

८) अविष्कार संशोधन महोत्सव-२०१८ साठी आयोजन करण्यात येत असून याबाबत सर्व महाविद्यालय/संस्था समन्वयक नेमूण प्रक्रिया पुर्ण करण्यास कळविले आहे.

९) अविष्कार संशोधन महोत्सव-२०१८ चे आयोजन करण्यासाठी महाविद्यालय/संस्थाना कळविण्यात आले आहे.

१०) प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शा.शि.संचालकांची रिक्त पदे भरण्यासाठी प्राप्त झालेल्या पाच (०५) प्रस्तावांची तपासणी करुन जाहिरातीच्या मसुदयास मान्यता देण्यात आली. त्यापैकी काही महाविद्यालयांनी जाहिरात प्रसिध्द केलेनुसार जाहिराती विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेत स्थळावर "Employment opportunity" या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आल्या. उर्वरित महाविद्यालयाने जाहिरात प्रसिध्द करताच जाहिराती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जातील.

११) विशेष कक्ष विभागात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी दि. ०१ जुलै, २०१८ ते ०६ सप्टेंबर, २०१८ अखेर पंधरा (१५) मागासवर्गीय उमेदवारांनी नाव नोंदणी केलेली असून, नाव नोंदणी केलेल्या उमेदवारांची नावे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर “Special cell” या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आली आहेत.

१२) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांमधून प्रतिवर्षी एका कर्मचा-यास विद्यापीठ वर्धापन दिनी "गुणवंत कर्मचारी पुरस्कार" प्रदान करण्यात येतो. त्यानुषंगाने संलग्नित महाविद्यालयाकडून "गुणवंत कर्मचारी पुरस्कार" साठी प्राप्त प्रस्तावांची मा. कुलगुरु महोदयांनी गठित केलेल्या समितीकडून छाननी/पडताळणी होऊन, शिफारस केलेले पात्र कर्मचारी वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर श्री. संगवे अजितकुमार बापुराव यांना विद्यापीठ वर्धापन दिनी दि. ०१ ऑगस्ट, २०१८ रोजी सन २०१८ चा "गुणवंत कर्मचारी पुरस्कार" प्रदान करण्यात आला.

१३) विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना करिअर गाईडन्स व्याख्यान आयोजनासाठी काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान मंजूर केले जाते. त्यानुषंगाने संलग्नित महाविद्यालयांकडून करिअर गाईडन्स व्याख्यान आयोजनास्तव काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान मागणीचे प्रस्ताव मागविण्यात आले.

१४) प्रस्तुत विद्यापीठात यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, बार्टी, पुणे व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने अ.जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले होते. सदर केंद्र सामाजिकशास्त्रे संकुलांतर्गत चालविण्यात येत होते. तथापी बार्टी, पुणे यांचेकडून सदर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी फक्त दोन

वर्षासाठी अनुदान प्राप्त झाले, तद्नंतर बार्टी, पुणे यांचेकडून अनुदान प्राप्त झालेले नाही. तथापी सदर स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये विविध स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक पुस्तके उपलब्ध असून, सदर पुस्तकांचा वापर सद्य:स्थितीत होत नसल्याने, सदर पुस्तकांचा वापर विद्यापीठातील विविध संकुलाकडील विद्यार्थी/विद्यार्थीनींना व वसतिगृहातील विद्यार्थी/ विद्यार्थीनींना व्हावा या हेतूने, विद्यापीठ स्तरावर स्पर्धा परीक्षा केंद्राचे कामकाज व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांनी डॉ. जी. जी. व्हनकडे, सामाजिकशास्त्रे संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांची निवड केली आहे व त्यानुषंगाने त्यांना कळविले आहे.

१५) छोटया संवर्गातील मागासवर्गीयाकरीता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दतीबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. बीसीसी-२०१६/प्र.क्र. २२८A/१६/१६-ब दि. २५ जुलै, २०१८ संलग्नित महाविद्यालयांना योग्य त्या पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आले आहे.

१६) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, स्थानिक निवड समिती अहवालानुसार योग्य ती कार्यवाही करून संबंधित महाविद्यालयास मान्यता असल्याचे कळविण्यात आले (एकूण ५९३ अध्यापकांना)

१७) कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राचार्यांना संस्थेच्या प्रस्तावच्या अनुषंगाने एका शै. वर्षासाठी पुन:श्च मुदतवाढ देण्यात आली आहे. (०३ प्राचार्य).

१८) महाविद्यालयातील रिक्त प्राचार्या पदी ०९ महाविद्यालयातील सेवाजेष्ठ अध्यापकांना प्रभारी प्राचार्य पदी मान्यता दिली आहे.

१९) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व प्राचार्य यांच्या मधून उत्कृष्ट प्राचार्य व शिक्षक पुरस्कार देण्यासाठी सर्व महाविद्यालयाकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने गठीत समितीची बैठक घेवून समितीने शिफारस केल्यानुसार दि. ०१ ऑगस्ट २०१८ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त शहरी विभागातून **प्राचार्य डॉ. महिबूब अ. माजीद दलाल**, सोलापूर सोशल असोसिएशन्स आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर यांना उत्कृष्ट प्राचार्य व **डॉ. सचिन रतिकांत गेंगजे,** वालचंद इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देण्यात आला. तर ग्रामीण विभागातून **प्राचार्य. डॉ. कैलास जगन्नाथ करांडे,**

एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, पंढरपूर, जि. सोलापूर व **डॉ. विकास लक्ष्मण कदम** कर्मवीर भाउराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देण्यात आला.

२०) लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर अणि कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर यांचे "Financial Assistance for Skill Based Education under National Skill Qualification Framework of Community College and B.Voc" चे प्रस्ताव युजीसी, नवी दिल्ली येथे पाठविण्यात आले.

२१) कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा या महाविद्यालयातील २ सहाय्यक प्राध्यापक, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील १ सहाय्यक प्राध्यापक आणि श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयातील १ सहाय्यक प्राध्यापक अशा एकूण ४ सहाय्यक प्राध्यापकांना स्टेज १ ते २ आणि स्टेज २ ते ३ मध्ये स्थाननिश्चिती देण्यात आली.

२२) वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील १ सहाय्यक प्राध्यापकांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नती देण्यात आली.

२३) डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील २ सहाय्यक प्राध्यापकांना स्टेज १ ते २ आणि स्टेज २ ते ३ मध्ये स्थाननिश्चितीकरिता समिती देण्यात आली.

२४) यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील १ सहाय्यक प्राध्यापक आणि डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील २ सहाय्यक प्राध्यापक अशा एकूण ३ सहाय्यक प्राध्यापकांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नतीकरिता निवड समिती देण्यात आली.

२५) "Seed Money for Research" या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील ६ महाविद्यालयातील ६ शिक्षकांना संशोधनाकरिता दुसऱ्या हप्त्याची एकूण रक्कम रु.२,६०,०००/- वितरीत करण्यात आली.

| अ. क्र. | शिक्षकांचे नाव | महाविद्यालयाचे नाव | विषय | दुसरा हप्ता | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. राजगुरु एस. पी. | लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर. | इंग्रजी | ३०,०००/- | ६०,०००/- |
| २. | श्री. मोरे जे. एल. | संतोष भीमराव पाटील आर्टस्, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज, मंद्रुप. | मराठी | ३०,०००/- | ६०,०००/- |
| ३. | श्री. शृंगारे एस. एन. | रसायनशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | रसायनशास्त्र | ५०,०००/- | १,००,०००/- |
| ४. | डॉ. श्रीमती मुळजकर एम. ओ. | वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर. | प्राणीशास्त्र | ५०,०००/- | १,००,०००/- |
| ५. | डॉ. कचरे पी. एस. | स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर. | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ५०,०००/- | १,००,०००/- |
| ६. | श्री. राऊत एल. बी. | स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर. | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ५०,०००/- | १,००,०००/- |
| | | **एकूण** | | **२,६०,०००/-** | **५,२०,०००/-** |

१) "Seed Money for Research" या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना संशोधनाकरिता विद्यापीठाकडून आर्थिक सहाय्य देण्याकरिता प्रस्ताव सादर करणेबाबत परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

२) **पीएच. डी.** व **एम. फिल** अभ्यासक्रमास प्रवेशीत तेविस **(२३)** विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा घेण्यात आली.

३) **संशोधन व मान्यता समितीच्या बैठका-**
- (i) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या चौदा (१४) विषयाच्या
- (ii) मानवविज्ञान विद्याशाखेच्या सह (६) विषयाच्या,
- (iii) आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या दोन (२) अशा एकुण बावीस (२२) बैठका घेण्यात आल्या.

४) **विभागीय संशोधन समितीच्या बैठका-**
- (i) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या तीन (३) विषयाच्या,
- (ii) मानवविज्ञान विद्याशाखेच्या पाच (५) विषयाच्या,
- (iii) आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या दोन (२) अशा एकुण दहा (१०) बैठका घेण्यात आल्या.

५) तसेच सन २०१५ साली घेण्यात आलेल्या PET-६ मधील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे सुरू असून PET-७ ची प्रवेश परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाकडून मार्गदर्शकांची माहिती मागविण्यात येत आहे.

६) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे ई-सुविधा शुल्कावरील GST ची रक्कम जमा करण्याबाबत सर्व महाविद्यालयांना जा. क्र. सोविसो/सांख्यिकी/ विभाग/२०१८-१९/७५३३ दि. ३० ऑगस्ट, २०१८ नुसार कळविण्यात आले.

७)	बृहत आराखडा संबंधित GER (Gross Enrollment Ration) तयार करण्यात आला.

८)	अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यापीठातील विविध संकुल / अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश पूर्व परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश फेरी व्दारे प्रवेश पूर्ण करण्यात आले असून आज अखेर विद्यापीठ संकुलातील प्रथम व व्दितीय वर्षाचे मिळून एकूण ७९३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत.

९)	अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यापीठ अधिविभागात प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क, एकलव्य आर्थिक सहाय्य योजना,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, सेंटर सेंक्टर व अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती इत्यादी योजनेसाठी लागणारे कागदपत्राची पूर्व तयारी करण्याबाबतचे परिपत्रक संबंधित संकुलाकडे पाठविण्यात आले आहे.

१०)	शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यापीठातील विविध संकुल / अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ. पंजाबराव वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेबाबत अंमलबजावणी करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार प्रत्येक महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर नोडल ऑफिसरची नियुक्ती करून सदर शिष्यवृत्तीस प्रसिध्दी करण्यासाठी डिजीटल बोर्ड लावण्यात आले आहेत.

११)	शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता विद्यापीठ परिसरामध्ये सामाजिकशास्त्रे संकुल (एम.ए-मराठी, इंग्रजी, संकृत व उर्दु) हे अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यात आले आहेत तसेच विद्यापीठ परिसरामध्ये पदवी स्तरावरील B.Tech Course in Cosmetic Technology हे कोर्स सुरु करण्यात आले असून त्यांचे प्रवेश विद्यापीठ संकुलामध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून थेट प्रवेश देण्याचे काम पूर्ण झाले आहे.

१२)	अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे प्रसतावमधील किरकोळ दुरूस्ती करून मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडे **एकूण ५८,२४,४५०/-** रूपये मिळण्याबाबतचे फेर प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.

१३) सर्व विद्याशाखेतील पदवीच्या तृतीय वर्षाचे सर्व अभ्यासक्रम हे निवड आधारित श्रेयांक प्रणाली (CBCS) नुसार करणेसाठी अभ्यासमंडळाने गठीत केलेल्या विविध विषयांच्या उपसमितीच्या, अभ्यासमंडळाच्या तसेच विद्याशाखेच्या बैठका घेवून सदर अभ्यासक्रम विद्यापरिषदेच्या अंतिम मान्यतेअंती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांना देखील परिपत्रकाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

१४) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून केवळ विद्यापीठ संकुलामध्ये सुरू असणाऱ्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास Communication Skill लागू करण्यात आला आहे.

१५) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतंर्गत अलाईड हेल्थ सायन्सेस या विषयातंर्गत नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

१६) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित "कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला २०१८" प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी व्याख्यानमालेचे ७ वे पुष्प दि.१९ सप्टेंबर, २०१८ रोजी श्री. **श्रीकांत देशमुख,** विभागीय सह.निबंधक, सहकार संस्था, लातूर यांचे रोजी **"शेती, सहकार आणि अर्थकारण"** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

१७) डॉ. किरणकुमार राजशेखर हिरेमठ यांच्या वतीने सोलापूर यांनी दि.१०/०७/२०१८ रोजी पत्रान्वये त्यांच्या आई श्रीमती मंदाकिनी राजशेखर हिरेमठ यांच्या वतीने सोलापूर विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातून **एम.ए. प्रथम व व्दितीय (समग्र मराठी) गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस / विद्यार्थीनीस** सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्णपदक **"कै.प्राध्यापक डॉ. राजशेखर गंगाधर हिरेमठ सुवर्णपदक"** या नावाने सुवर्णपदक चालू करण्यासाठी धनादेशाव्दारे रू.१,०९,०००/- दिलेले असून त्यांना याबाबत आभारपत्रदेखील पाठविण्यात आलेले आहे.

१८) विविध संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील संकुलाकडून अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र / कार्यशाळा आयोजनाकरिता दि.३१ ऑगस्ट, २०१८ पर्यंत प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

१९) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता NRI/OCI/PIO Foreign students यांना अंतरिम पात्रता प्रमाणपत्र देण्याबाबत परिपत्रक जा.क्र./सोविसो/पात्रता विभाग/२०१८-१९/५७९८, दि.०९/०७/२०१८ रोजी विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले.

२०) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता CBCS New Delhi, NEWC (USA) WEST BENGOL CONCIL OF EDUCATION BOARD KOLKATA, U.P. BOARD, M. P. MADHYAPRADESH, BIHAR SATE EDUCATION, अशा मंडळांचे प्रस्तुत विद्यापीठता पदवी अभ्यासक्रमास पात्र असण्याबाबत विषय विद्या परिषदे समोर ठराव ठेवून मंजूर करुन घेण्यात आला. व याबद्दलचे परिपत्रक जा.क्र. /सोविसो/पात्रता विभाग/२०१८-१९/५६६०, दि.१२/०७/२०१८ रोजी विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले.

२१) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता पदवी व पदव्युत्तर पारंपारिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशीत असलेल्या विद्यार्थ्यांना पात्रता अर्ज विद्यापीठात सादर करण्याबाबत मुदतवाढ देवून सदरचे परिपत्रक जा.क्र. / सोविसो / पात्रता विभाग / २०१८-१९/५७९८, दि.३१/०७/२०१८ रोजी विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले.

२२) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे पात्रता अर्ज जमा करुन घेण्यात आले आहेत. तसेच पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशीत एकुण **२४,२००** इतक्या विद्यार्थ्यांना Provissional Eligible करण्यात आला आहे.

२३) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता आर्किटेक्चर, अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर, एम. बी. ए., औषधनिर्माण शास्त्र पदवी व पदव्युत्तर या अभ्यासक्रमाचे पात्रता पात्रतासंदर्भातील तारखा निश्चित करुन याबाबतचे परिपत्रक जा.क्र./ सोविसो / पात्रता विभाग / २०१८-१९ / ७५१६, दि.३०/०८/२०१८ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

२४) १२ जूलै पूरवणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पात्रता पात्रतासंदर्भातील तारखा निश्चित करुन याबाबतचे परिपत्रक जा.क्र./ सोविसो / पात्रता विभाग / २०१८-१९ / ७५३९, दि.३१/०८/२०१८ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

२५) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ते २०१७-१८ मध्ये पीएच. डी. या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची तपासणी करुन ज्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागद पत्रांची पूर्तता केली नाही, अशा विद्यार्थ्यांच्या नावांची यादी तसेच पात्र विद्यार्थ्यांच्या नावांच्या यादया देखील संबंधीत महाविद्यालयांना व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.) यांना कळविण्यात आली आहे.

२६) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५-१६-१७-२०१८ करीता प्रवेशीत कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, एम.ए. (सर्व विषय) एम. कॉम., एम.एस्सी. (सर्व विषय) एम. सी. ए. पी. जी. डी. सी. ए., डी. बी. एम. एम. एस. डब्ल्यू. एम. बी. ए. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटीं संबंधीत महाविद्यालयांना व विद्यापीठातील संकुलांना ३१/१२/२०१५ व १५/०३/२०१८ पुर्वी ऑनलाईन कळविण्यात आल्या होत्या. परंतु सदरील मुदतीनंतर त्रुटींची पूर्तता केलेल्या व पात्र असणाऱ्या विद्यार्थ्याची रु.५००/- प्रमाणे दंडाची रक्कम आकारणी करुन पात्रता कायम करण्यात येत आहे.

२७) अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर या अभ्यासक्रमांची विद्यार्थ्यांचे पात्रता अर्जाची तपासणी काम अद्याप प्रस्तुत विभागामार्फत चालू आहे.

➢ **परीक्षा व मूल्यमापन विभाग:**

१) माहे ऑक्टो / नोव्हें २०१८ मधील अभ्यासक्रमाचे सत्रनिहाय कच्चे वेळापत्रक (Draft) विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

२) माहे जुलै / ऑगस्ट, २०१८ मधील एम. फील/पीएच.डी. कोर्स वर्क लेखी परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्यात आल्या.

३) माहे ऑक्टो / नोव्हें २०१८ मध्ये अभियांत्रिकी विद्याशाखेचे उत्तपत्रिकांचे On Screen Evaluation करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

४) मार्च / एप्रिल २०१८ मधील सर्व अभ्यासक्रमाचे पुनर्मूल्यांकनाचे निकाल विहित वेळेत विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात येत आहे.

५) विद्यापीठाच्या १४ व्या दीक्षांत समारंभाकरिता पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

६) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये बहिस्थ अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

७) माहे ऑक्टो / नोव्हें २०१८ पासून बी. ए. / बी. कॉम. / बी. एस्सी. या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा ह्या महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करण्याबाबत मा. व्यवस्थापन परिषदेने गठित केलेल्या समितीची दि.०४/०९/२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली.

८) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ४८ (३) मधील तरतूदीनुसार संबंधित विषयांच्या चेअरमनमकडून प्राश्निक, परीक्षक व नियामकाचे पॅनेल अद्यावत करण्यात आले असून माहे ऑक्टो / नोव्हें २०१८ संपन्न होणाऱ्या परीक्षेचे प्रश्नसंच तयार करण्याचे कामकाज सुरु आहे.

➢ **वित्त व लेखा विभाग:**

१) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आलेले असून सदर लेखापरीक्षण अहवाल वित्त व लेखा समितीच्या मान्यतेची शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेने वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल व अनुपालन अहवाल स्विकारुन अधिसभेसाठी शिफारस केली होती त्यास दि. २९ सप्टेंबर, २०१८ च्या अधिसभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

२) सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, प्राधिकरण सदस्य व मक्तेदार यांचे देयक ऑनलाईन पध्दतीने आदा करण्याकरिता Bill Management & Payment System (BMPS-SUS) ही संगणक प्रणाली विकसित करण्यात येत असून त्यामधून ऑनलाईन पध्दतीने संबंधितांना त्यांचे देयकाची सद्यस्थिती पाहता येणार आहे.

➢ **नॅक / रुसा:**

१) रुसा अंतर्गत Research for Resurgence या विषयावर दि.१९ व २० जुलै, २०१८ रोजी मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

२) नॅक बेंगलोर यांना विद्यापीठाचा AQAR Report भरुन पाठविणेबाबत दि.२७/०८/२०१८ रोजी सकाळी १२.०० वा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

➢ **ज्ञानस्त्रोत केंद्र:**

१) ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत दि.३०/०५/२०१८ व ३१/०८/२०१८ रोजी सामाजिकशास्त्रे संकुलात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते. विद्यापीठातील सर्व संकुलाचे संचालक, प्राध्यापक व्यवस्थापन मंडळाचे सदस्य व प्रशासकीय कर्मचारी यांनी २७२३ पुस्तकांची खेरदीची शिफारस केलेली असून व त्या सर्व पुस्तकांची खरेदीची पुरवठा आदेश देण्यात आलेली आहे.

२) सन २०१८-१९ या चालू शैक्षणिक वर्षामधील विद्यापीठातील पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी व संशोधक यांना ओळखपत्र (RFID Smart Card) देण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

३) दि.०९ ऑगस्ट, २०१८ रोजी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त मा. डॉ. सुहास पुजारी, मराठी विभाग प्रमुख यांचे “ग्रंथालय साक्षराता आणि ग्रंथालयाची वापर” या विषयावर विद्यापीठाकडील पदव्युत्तर वर्गाच्या सर्व विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक यांच्याकरिता मा. कुलगुरुमहोदया यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

४) ज्ञानस्त्रोत केंद्राकडून थोर राष्ट्रीय पुरुषांचे साहित्य (खंड) मा. व्यवस्थापन, शासकीय फोटो मुद्रणालय व ग्रंथगार पुणे यांच्याकडून ४० शासकीय पुस्तके खरेदी करण्यात आलेली आहेत.

५) सोलापूर विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राचे आधुनिकीकरण करण्यासाठी RUSA Phase II अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानातून १) EzProxy २) Fed Gate या Software ची खरेदी प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

➢ **संकुले:**

१) मास कम्युनिकेशन विभागातील अध्यापक व विद्यार्थ्यांनी जुलै, २०१८ मध्ये "प्लास्टिक बंदीबाबत सोलापूरातील नागरिकांच्या मताचे सर्वेक्षण" केले. यात सोलापूरातील विविध प्रभागातू २०८ उत्तरदात्यांनी (नागरिकांनी) प्रश्नावलीत दिलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. या अध्यायातून हाती आलेले निष्कर्ष १४ ऑगस्ट, २०१८ रोजी सामाजिक शास्त्रे संकुलात झालेल्या संशोधन कार्यशाळेत सादर करण्यात आले.

२) मास कम्युनिकेशन विभागातर्फे आर्थिक पत्रकारिता या विषयावर ७ ऑगस्ट, २०१८ रोजी मा. श्री. यमाजी मालकर, संपादक अर्थक्रांती, पुणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

३) मास कम्युनिकेशन विभाग, सोलापूर विद्यापीठ आणि अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर (स्वेरी) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ ऑगस्ट २०१८ रोजी पंढरपूर येथे "पत्रकारिता काल, आज आणि उद्या" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. यात मा. श्री. नीलेश खरे, संपादक, साम टीव्ही मुंबई, मा. श्री. रविंद्र अंबेकर, संपादक, मॅक्स महाराष्ट्र, मुंबई मा. श्री. युवराज माहिते, माध्यमतज्ञ तसेच मा. श्री. अभय दिवाणजी सहयोगी संपादक, सकाळ व मा. श्रीकांत कांबळे, वरिष्ठ वृत्तसंपादक, दिव्य मराठी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत ३०० पत्रकार सहभागी झाले होते.

४) दि. २० ऑगस्ट २०१८ रोजी मास कम्युनिकेशन विभागातर्फे "विकिपिडीया कार्यशाळा" घेण्यात आली. यात मास कम्युनिकेशन विभागाच्या अध्यापक व विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यलढया संदर्भात "मराठी विकिपिडीया" वर मजकूर लेखन व संपादन करुन ज्ञाननिर्मितीत महत्वाचे योगदान दिले.

५) दि. २४ ऑगस्ट, २०१८ रोजी मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने विद्यापीठातील सर्व संकुलाच्या विद्यार्थ्यांसाठी "इकोरेंजर" या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक जागृती घडविण्यासाठी हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी इको रेंजर उपक्रमाचे संचालक मा. वीरेंद्र चित्राव (पुणे), सोलापूर येथील किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीचे व्यवस्थापक तसेच विद्यापीठातील विशेष कार्यासन अधिकारी डॉ.व्ही.बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी १५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

६) डॉ. पी.एन. कोळेकर यांनी महिला मानवी हक्क या राष्ट्रीय कार्यशाळेत Social Movement in India & Human rights या विषयावर मार्गदर्शन केले.

७) डॉ. पी.एन.कोळेकर यांनी दि. ०३/०९/२०१८ रोजी प्रा.भा.इ.स आणि पुरातत्वशास्त्र विभाग व INTACH सोलापूर शाखा यांच्या वतीने जागो-युवा-वारसा जागृती संवर्धन कार्यशाळेचे समन्वयक म्हणुन कार्य केले.

८) डॉ. पी.एन.कोळेकर यांनी दि. ०६/०९/२०१८ रोजी श्री.शिवाजी महाविद्यालय बार्शी येथे सामाजिक शास्त्र मंडळाचे उद्‌घाटन वेळी “सामाजिक शास्त्रे आव्हाने व रोजगार संधी” या विषयी मार्गदर्शन केले.

९) महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर शाखा यांच्या वतीने आयोजित "श्रावणधारा" कविता वाचन स्पर्धेचे आयोजन समितीमध्ये आयोजक समिती सदस्य म्हणुन कार्य केले.

१०) मीनाताई साणे यांचे महिला व कामगार चळवळीतील योगदान या विषयावर UGC Approved Listed Journal करीता संशोधन लेख प्रकाशन करण्यासाठी सादर केला.

११) दि. १८ ऑगस्ट २०१८ रोजी डॉ. माया पाटील, विभागप्रमुख प्रा.भा.इ.सं व पुरातत्वशास्त्र विभाग यांनी "प्राचीन तगर- तेर" या विषयावर जिज्ञासा इतिहास संशोधन व संवर्धन संस्था, सातारा येथे व्याख्यान दिले.

१२) दि. १ सप्टेंबर, २०१८ रोजी M.A. I व II वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मंगळवेढा, सिध्दनकेरी, कोरवली, माचणूर येथे क्षेत्रीय भेटीचे आयोजन केले.

१३) प्रा.भा.इ.सं व पुरातत्व शास्त्र विभाग व INTACH सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ३ सप्टेंबर २०१८ रोजी "वारसा कार्यकर्ता प्रशिक्षण" शिबिराचे आयोजन करण्यात आले.

१४) दि. ३० ऑगस्ट, २०१८ रोजी स्त्रिया व मानवाधिकार या एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

१५) डॉ. माया पाटील यांनी दि. ०१/०९/२०१८ रोजी संत दामाजी कॉलेज, मंगळवेढा या ठिकाणी “पुरातत्व व पर्यटन” या विषयावर व्याख्यान दिले.

१६) दि. १४/०८/२०१८ रोजी "किमान आधारभूत किंमत मानव विकास अहवाल व उजनी पाणी धरण" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

१७) दि. ३०/०८/२०१८ रोजी Women and Human Rights या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

१८) दि. ०३/०९/२०१८ रोजी “जागो युवा २०१८” परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

१९) दि. २६/०७/२०१८ रोजी "उद्योजकता आणि तरुणांना असलेली संधी" या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२०) संगणकशास्त्र संकुलातील संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे यांचे मुंबई विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अभ्यासमंडळाच्या संशोधन व मान्यता समितीवर नामनिर्देशन झाले आहे.

२१) संगणकशास्त्र संकुलात दि. ०५/०९/२०१८ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

२२) श्रीमती माशाळे जे. डी. प्र. विभागप्रमुख गणित विभाग यांनी University of Hydrabad, Hydrabad येथे आयोजित Mathematics व Statistics या विषयाचा दि. ०४/०७/२०१८ ते २४/०७/२०१८ या दरम्यान Refresher हा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला.

२३) श्री. शिंदे ए. आर. यांनी १२० वा Orientation Course दि. ०१/०८/२०१८ ते ३१/०८/२०१८ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, UGC HRDC औरंगाबाद येथे यशस्वीरित्या पूर्ण केला.

२४) दि. ०९/०७/२०१८ रोजी iTech Business Solutions Pvt. Ltd. या कंपनी मार्फत पुणे येथे MCA या विद्यार्थ्यांसाठी Off Campus Interview चे आयोजन करण्यात आले.

२५) दि. ०१ व ०२ सप्टेंबर, २०१८ रोजी "How to Crack Technical Aptitute" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

२६) MCA व M.Sc. च्या विद्यार्थ्यांसाठी ७ सप्टेंबर, २०१८ रोजी Wexoz Technologies Pune या कंपनीमार्फत मुलाखतीचे आयोजन करण्यात आले.

२७) प्रा. व्ही. बी. पाटील यांना विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कामाबद्दल "गुणवंत शिक्षक" म्हणुन पुरस्कार दिला.

२८) दि. १४/०८/२०१८ रोजी सामाजिकशास्त्रे संकुलांनी एक दिवशीय कार्यशाळा आयोजित कार्यक्रमामध्ये डॉ. अमोल गजधाने यांनी मानव विकास निर्देशांक या विषयावर सादरीकरण केले.

२९) दि. १४/०८/२०१८ रोजी सामाजिकशास्त्रे संकुलांनी एक दिवशीय कार्यशाळा आयोजित कार्यक्रमामध्ये डॉ. रमेश गाढवे यांनी किमान आधारभूत किंमत या विषयावर सादरीकरण केले.

३०) वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामध्ये एम.कॉम.भाग १ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ दि. २५/०८/२०१८ रोजी करण्यात आला.

३१) दि. ३०/०८/२०१८ रोजी सामाजिकशास्त्रे संकुलांनी महिला व मानवी हक्क या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित कार्यक्रमामध्ये डॉ. अमोल गजधाने यांनी संशोधन पेपरचे सादरीकरण केले.

३२) दि. ३०/०८/२०१८ रोजी सामाजिकशास्त्रे संकुलांनी महिला व मानवी हक्क या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित कार्यक्रमामध्ये डॉ. रमेश गाढवे यांनी संशोधन पेपरचे सादरीकरण केले.

३३) दि. ३०/०८/२०१८ रोजी सामाजिकशास्त्रे संकुलांनी महिला व मानवी हक्क या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित कार्यक्रमामध्ये कु. चिप्पा पी. ए. यांनी सहभाग घेतला.

३४) वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामध्ये दि. ०१/०९/२०१८ रोजी ICICI Bank व Kotak Mahindra बँकेमार्फत Campus Interview चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संकुलातील व संकुलाबाहेरील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३५) वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामध्ये दि. ०५/०९/२०१८ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

३६) वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील सहा. प्राध्यापक डॉ. रमेश गाढवे यांची भाषा संकुलाचे समन्वयक म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

३७) वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील सहा. प्राध्यापक डॉ. अमोल गजधाने यांची एम.बी.ए. विभागाचे समन्वयक म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

३८) भूशास्त्र संकुलामध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता भूशास्त्र, भूमाहितीशास्त्र आणि पर्यावरणशास्त्र पदव्युत्तर प्रथम व द्वितीय वर्षासाठी विद्यार्थ्यांना संकुलाकडील प्रवेश समितीकडून प्रवेश देण्यात आले.

३९) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पदव्युत्तर प्रथम वर्षाकरिता भूशास्त्र विषयासाठी ०७, भूमाहितीशास्त्र विषयासाठी १६ आणि पर्यावरणशास्त्र विषयासाठी १६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

४०) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पदव्युत्तर द्वितीय वर्षाकरिता भूशास्त्र विषयासाठी ०८, भूमाहितीशास्त्र विषयासाठी १० आणि पर्यावरणशास्त्र विषयासाठी १४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

४१) संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ. डी. डी. कुलकर्णी यांनी दि. ०२ ऑगस्ट २०१८ ते दि. ०३ सप्टेंबर २०१८ या कालावधीमध्ये प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार स्विकारला होता.

४२) ॲग्रो टुरिझम या प्रकल्पासाठी विद्यापीठाकडील ५०० एकर परिसरामध्ये संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ. डी. डी. कुलकर्णी यांनी यशस्वी भूजल सर्वेक्षण केले आहे.

४३) संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ. डी. डी. कुलकर्णी यांचा "Remote Sensing and GIS Studies in Evolution of Shastri River Basin, Ratnagiri District, Maharashtra : A Geomorphic Approach" या विषयावरील पेपर ऑगस्ट २०१८ मध्ये Journal of Emerging Technology Innovative Research, Volume ५, Issue ८ (ISSN-२३४९-५१६२) मध्ये प्रकाशित झाला आहे.

४४) पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. १२ जुलै २०१८ रोजी संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही. पी. धुळप यांनी "Drinking Water Quality Management" या विषयावर पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

४५) पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. १३ ऑगस्ट २०१८ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ प्रायोजित NAAQM या प्रोजेक्टसाठी कनिष्ठ प्रयोगशाळा / क्षेत्र सहाय्यक या पदाच्या मुलाखतीसाठी संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापका डॉ. व्ही. पी. धुळप विषयतज्ञ म्हणून उपस्थित होते.

४६) भूशास्त्र संकुलामध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने पाहुणे व्याख्याता डॉ. राम राज माथूर, सहयोगी प्राध्यापक, Department of Geophysics, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद यांना दि. २३ व २४ ऑगस्ट २०१८ दरम्यान संकुलामध्ये "Gravity Surveys and GPR Surveys" या विषयावरील व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले होते. सदरील व्याख्याना दरम्यान Gravity Surveys and GPR Surveys करिता प्रात्यक्षिकासाठी मु. पो. नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथे संकुलाकडील Applied Geology एम. एस्सी. भाग १ व २ मधील विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि शिक्षक तसेच विषयतज्ञ उपस्थित होते.

भूशास्त्र संकुलामध्ये दि. ३०/०८/२०१८ रोजी "Basics of Camera" व "Connect to nature through photography" या विषयावरिल मागदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील व्याख्यानासाठी विषयतज्ञ डॉ. व्ही. एस. मेतन (Wildlife Photographer), सोलापूर यांना आमंत्रित करण्यात आले होते. व्याख्यानासाठी संकुलातील सर्व शिक्षक आणि पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

४७) संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही. पी. धुळप यांनी युजीसी- मनुष्यबळ विकास केंद्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजित Refresher Course in Environmental Studies (ID) (for all subjects) या विषयावर दि. ०४ सप्टेंबर २०१८ रोजी मार्गदर्शन केले.

४८) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता संकुलाकडील एकुण ०४ विद्यार्थ्यांची "कमवा व शिका" या योजनेसाठी निवड झाली आहे.

४९) संकुलामध्ये Communication Skill, Technical Presentation Course व Add on Skill Base Courses या विषयावर दि.२९/०७/२०१८ व दि.१९/०८/२०१८ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील प्रशिक्षण कार्यशाळेसाठी संकुलाकडील पदव्युत्तर विभागातील सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थीनी तसेच समन्वयक श्री. एस. पी. बावीस्कर, सहाय्यक प्राध्यापक उपस्थित होते.

- **राष्ट्रीय सेवा योजना:**

१. दि.१९/०७/२०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत श्री. संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली व जगदगुरु श्री संत तुकारात महाराज पालखी स्वागत सोहळ्यासाठी हरित वारी निर्मल वारी मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग करुन यशस्वीरित्या पार पाडण्यात आले.

२. सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेले सर्व महाविद्यालयांना २० जुलै, २०१८ रोजी वृक्षारोपन कार्यक्रमाबाबत प्रत्येक महाविद्यालयाने वृक्षारोपण करावे वृक्षारोपणाचे अहवाल फोटोसह मागविण्यात आले होते. तसेच महाराष्ट्र शासनाचे १३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिस्ट डोळ्यासमोर ठेवून सोलापूर विद्यापीठात विद्यार्थी यांच्यामार्फत श्रमदानातून वृक्षलागवड करण्यात आले.

३. २६ जानेवारी, २०१८ रोजी राज्यस्तरीय / राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन होणाऱ्या पुर्व प्रजासत्ताक संचालनासाठी राष्ट्रीय सेवा योजना मधून ५ स्वयंसेवक, ५ सवयंसेविका आणि १ कार्यक्रम अधिकारी असा एकुण ११ जणांचा संघ तयार करुन निवड शिबीरासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे पाठविण्यात आले.

४. राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत २० ऑगस्ट, २०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करण्यात आले होते.

५. दरवर्षी प्रामणे सोलापूर विद्याीपठाच्या वर्धापन दिनी राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे १ उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, १ उत्कृष्ट महाविद्यालय आणि ३ उत्कृष्ट स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात येत असून दि. २९ ऑगस्ट, २०१८ रोजी क्रीडा दिनी सत्कार करण्यात आला.

**विद्यापीठ स्तरीय पुरस्कार २०१८-१९**

१. उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी: प्रा. सोपान वामन सुरवसे, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते २) उत्कृष्ट महाविद्यालय: सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते ३) उत्कृष्ट स्वयंसेवक: प्रथम क्रमांक- कु. स्वप्नाली दिलीप जाधव, द्वितीय क्रमांक- श्री. ओंकार हरी कालेकर ४) तृतीय क्रमांक: श्री. योगीनाथ महोदव नागशेट्टी

६. सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा स्तरावर आयोजित युथ पार्लमेंटचे व कार्यशाळेत विद्यार्थ्यांची नोंदणी करणेबाबत पत्र पाठविण्यात आले.

७. सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे जागतिक अवयवदान दिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

८. राष्ट्रीय सेवा याजने अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये नि:स्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करण्याऱ्यांना अंगिकृत कामात प्रोत्साहन मिळावे व त्यांचा नि:स्वार्थ सेवेचा यथोचित गौरव करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे सर्वोत्कृष्ट विद्यापीठ, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाण पत्र सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार इ. राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आले. १) सर्वोत्कृष्ट स्वयंसेविका: कु. स्वप्नाली जाधव, सहकार महार्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, अकलूज.

९. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून मा. कुलगुरुमहोदया, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी सन २०१८-१९ व २०१९-२० या दोन वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योना सल्लागार समिती सदस्य पदी नियुक्ती केलेल्या सर्व सदस्यांना त्याबद्दल विद्यापीठाच्या वतीने अभिनंदन पत्र पाठविण्यात आले.

१०. सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजनेकडून स्वच्छ भारत पंधरवडा १ ते १५ ऑगस्ट या कालावधित उपक्रम राबवून त्याचा अहवाल फोटोसह संबंधित विभागाकडे मागविण्यात आला.

## ➢ विद्यार्थी विकास विभाग:

१. सन २०१७-१८ या वर्षातील स्पर्धेसाठी पारंपारिक व व्यवसायिक महाविद्यालयांना सहभागी होण्यासाठी दि.०५/०५/२०१८ हि तारीख देण्यात आली होती. त्यानुसार एकुण ३१ महाविद्यालयांनी सदर स्पर्धेत सहभाग नोदविला आहे. त्यापैकी पारंपरिक महाविद्यालये २२ व व्यवसायिक महाविद्यालये ०९ अशी आहेत. मा कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेनुसार विविध परिक्षकांना सदरचे नियतकालीक परिक्षणासाठी पाहोच करण्यात आले आहेत.

विविध विविध विषयांच्या तज्ज्ंाकडून नियतकालीकाचे परिक्षण करुन घेण्यात आले. त्याचा निकाल एकत्रीत करून प्रथम, व्दितीय, तृतिय क्रमाकास गुणांकन देवून खालील प्रमाणे निकाल देण्यात आलेला आहे.

| पारंपारिक महाविद्यालये सर्व साधारण विजेते पद | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | पारितोषिक प्राप्त महाविद्यालयाचे नाव | नियतकालिकाचे नाव | क्रमांक |
| १ | हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर | हिरा | प्रथम |
| २ | डी बी एफ दयांनद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर | दयानंद | व्दितीय |
| ३ | संगमेश्वर महाविद्यालय सोलापूर | प्रज्ञा | तृतीय |
| ४ | वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर | विद्यारयण | उत्तेजनार्थ |
| ५ | एस एस ए सोशल महाविद्यालय, सोलापूर | मॅसेज | उत्तेजनार्थ |

| व्यवसायिक महाविद्यालये सर्व साधारण विजेते पद | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | पारितोषिक प्राप्त महाविद्यालयाचे नाव | नियतकालिकाचे नाव | क्रमांक |
| १ | वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर | विटनेस | प्रथम |
| २ | नागेश करजगी ऑर्कीड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर | आर्कीडऔरा | व्दितीय |
| ३ | एन.बी. नवले सिहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापुर | साहीत्यगड | तृतीय |
| ४ | व्ही. व्ही. पी. अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर | विद्या | उत्तेजनार्थ |
| ५ | स्वेरीज अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर | एक्सप्रोलर | उत्तेजनार्थ |

उपरोक्त तक्ता विचारात घेता व्यवसायिक व पारंपरिक महाविद्यालयाचे विभाजन करून समान पध्दतीने प्रथम दोन, द्वितीय दोन, तृतीय दोन व उत्तेजनार्थ चार असा निकाल तयार करण्यात आला व दि.२९/०८/२०१८ क्रीडा दिन रोजी संबंधित विजेते महाविद्यालयांच्या प्रतिनिधींना विद्यापीठात आमंत्रित करून त्यांचा सत्कार करण्यात आला

## क्रीडा विभाग:

१. दि.२९ ऑगस्ट, २०१८ राष्ट्रीय क्रीडा दिनी सन २०१७-१८ मधील पदक प्राप्त विजेत्या खेळाडूंचे त्यांच्या संघ मार्गदर्शक, व्यवस्थापक यांचा ब्लेजर स्मृतीचिन्ह, बक्षिस देवून सत्कार करण्यात आला.

२. अखिल भारतीय/पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव या स्पर्धेच्या सराव शिबीराकरिता तसेच विद्यापीठ संकुलात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा साहित्य खरेदी करण्याची कार्यालयीन कार्यवाही करण्यात येवून तुलनात्मक तक्त्याच्या शिफारसी नुसार पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.

३. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती विद्यापीठाने अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी “कुलगुरु चषक” टी-२० क्रिकेट स्पर्धा २०१९ चे आयोजन दि.०६ ते १३ जानेवारी, २०१९ पासून केल्याचे कळविले होते. त्यानुसार मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेन्वये शिक्षक / शिक्षकेत्तर क्रिकेट कर्मचारी संघाचे प्रवेश शुल्क पाठविण्यात आले आहे.

४. सन २०१८-१९ च्या क्रीडा स्पर्धा ऑक्टोबर २०१८ पासून सुरु होणार असून विद्यापीठाचे विविध खेळांचे संघ घेवून जाणाऱ्या संघ मार्गदर्शक / संघ व्सवस्थापक यांना क्रीडा विभागाकडून ट्रॅक सुट व क्रीडा किटस् देण्यात येतात, त्यासाठी ई निविदा प्रसिध्दीकरण करण्यात आले होते. त्याच्या तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्याच्या तांत्रिक उघडण्यात आल्या आहेत. त्याच्या तात्रिकबाबी तपासणी झाल्यानंतर दराची निविदा उघडण्यात येणार आहेत.

५. क्रीडा भवनाच्या बांधकामासाठी विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या कडून निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्तावाची आवश्यक माहिती संकलीत करण्याचे काम सुरु आहे.

६. ४०० मीटर ८ लेन रनिंग ट्रॅकच्या कामाची पडताळणीसाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात येवून त्याकामाची पडताळी करुन त्याचा अहवाल मा. कुलसचिव महोदय यांना सादर करण्यात आला.

७. AIU यांच्या प्रसिध्द करण्यात आलेल्या सन २०१६-१७ च्या नियोजित स्पर्धेच्या तारखानुसार त्या त्या खेळांच्या स्पर्धेच्या ठिकाणी संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिव व AIU यांना त्या त्या खेळांच्या प्रवेशिका स्पिड पोस्टाने पाठविण्यात आल्या आहेत. प्रवेशिकेची एक प्रत ई मेल द्वारे पाठविण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

८. सन २०१८-१९ च्या आखिल भारतीय आंतरविद्यापीठ / पश्चिम विभागीय / क्रीडा महोत्सव स्पर्धेची निवड समिती यादी तयार करण्यात आली असून निवड समिती यादी नुसार संबंधित चेअरमन / सदस्य यांना आंतर महाविद्यालयीन स्पर्धेस उपस्थित राहुन विद्यापीठाच्या संघ निवडण्यासाठीचे पत्र पाठविण्यात आले आहे.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ १ ] अधिसभेच्या दि.२८ मार्च, २०१८ रोजी झालेल्या विशेष बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/३४८३, दि.२३/०४/२०१८ अन्वये, दि.२८ मार्च, २०१८ रोजी झालेल्या विशेष बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२१/०५/२०१८ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.२८ मार्च, २०१८ रोजी झालेल्या विशेष बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

**ठराव: अधिसभेच्या दि.२८ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

[ २ ] **अधिसभेच्या दि.१७ जुलै, २०१८ रोजी झालेल्या १८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/६८१२, दि.०९/०८/२०१८ अन्वये, दि.१७ जुलै, २०१८ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.०६/०९/२०१८ अशी होती. या मुदतीत डॉ. एस. के. शिंदे यांनी विषय क्र.६ मध्ये दुरुस्ती सुचविली असून ती खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे दुरुस्त ठराव स्वीकारलेला आहे.

**मूळ उपप्रश्न व उत्तर**

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| प्रा. डॉ. जी. डी. बिराजदार | | प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे |
| | • मेटकरी, देवकन्या पांढरे आणि आर. वाय. पाटील यांचे वेतन विद्यापीठ विकास निधीतून दिले आहे का? | मेटकरी, देवकन्या पांढरे यांना दिलेले आहे. बाकी लोकांचं जसं तेच पेस्केल आहे तसं त्यांना मिळालेलं आहे. |

डॉ. एस. के. शिंदे यांनी खालीलप्रमाणे अधोरेखित केलेली दुरुस्ती सुचविली आहे.

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| प्रा. डॉ. जी. डी. बिराजदार | | प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे |
| | • मेटकरी, देवकन्या पांढरे आणि आर. वाय. पाटील यांचे वेतन विद्यापीठ विकास निधीतून दिले आहे का? | **श्री. मेटकरी व श्रीमती देवकन्या पांढरे यांचे वेतन हे विद्यापीठ फंडातून न होता सेवार्थ मधून शासनाकडून होत आहे.** |

सबब, वरील दुरुस्तीसह अधिसभेचा दि.१७ जुलै, २०१८ रोजी झालेल्या १८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

ठराव: **अधिसभेचा दि.१७ जुलै, २०१८ रोजी झालेल्या १८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला.**

[ ३ ] **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ (२) (d)** Inspection of Colleges and recognized institutions and report **या अधिकार मंडळावर** One expert, to be nominated by the Senate **याप्रमाणे एक अधिसभा सदस्य नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि.०१/०३/२०१७ पासून अंमलात आला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ (२) (d) नुसार (d) Inspection of Colleges and recognized institutions and report या अधिकार मंडळावर One expert, to be nominated by the Senate याप्रमाणे तरतूद खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ (२) (d) | प्र-कुलगुरु, त्याने त्याबाबतीत नियुक्त केलेल्या एका किंवा अधिक समित्यांकडून प्रत्येक विद्यापीठ विभागाची किंवा परिसंस्थेची, संलग्न महाविद्यालयाची किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेची, प्रत्येक तीन वर्षातून किमान एकदा तपासणी करण्याची व्यवस्था करील आणि त्या समितीमध्ये एक अधिसभा सदस्याचा समावेश असेल. |

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधनियम, २०१६ कलम ११७ (२) (d) नुसार Inspection of Colleges and recognized institutions and report या अधिकार मंडळावर One expert, to be nominated by the Senate याप्रमाणे एका अधिसभा सदस्याचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **डॉ. एस. के. शिंदे यांनी डॉ. टी. जे. फुलारी यांचे नाव सूचविले व त्यास डॉ. जी. डी. बिराजदार यांनी अनुमोदन दिले त्यानुसार डॉ. टी. जे. फुलारी यांचे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ (२) (d) नुसार** Inspection of Colleges and recognized institutions and report **या समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ४ ] सन २०१७-१८ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेची शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३५ (२) नुसार, सन २९१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याकरिता APA Associates, Solapur यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. TAP Associates, Solapur यांनी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन लेखापरीक्षण अहवाल दिलेला आहे. या लेखापरीक्षण अहवालावरील आक्षेप व लेखापरीक्षण अहवाल अंतिम करण्यासाठी (Account Code १.५०h) नुसार मा. कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीची उपसमिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात आली आहे.

१) प्रा. महेश माने

२) श्रीमती एम. डी. कुलकर्णी

३) डॉ. गौतम कांबळे

४) डॉ. बी. सी. शेवाळे

या समितीने दि.३१/०७/२०१८ रोजी बैठक आयोजित करुन आक्षेपावर संबंधित विभागाने सादर केलेला पूर्तता अहवालावर सविस्तर चर्चा केल व त्यांची शिफारस अहवाल वित्त व लेखा समितीकडे सादर केला आहे. दि.१०/०८/२०१८ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत विषय क्र.२ अन्वये लेखापरीक्षक यांनी सादर केलेला लेखापरीक्षण अहवाल व आक्षेप पूर्तता अहवाल विचारार्थ सादर करण्यात आला असता, खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव: | **सन २०१७-१८ लेखापरीक्षण अहवाल व लेखापरिक्षीत लेख्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपाबाबत उपसमितीने केलेल्या शिफारशी स्विकारण्यात येवून लेखापरीक्षण अहवाल, लेखापरिक्षीत लेखे, अनुपालन व उपसमिती शिफारस अहवाल मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.** |

वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दि.२१/०८/२०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४ (६) (क) व ३१ (यघ) नुसार, सन २०१७-१८ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल संदर्भात वित्त व लेखा समितीने केलेल्या शिफारशी स्विकारुन अधिसभेस मान्यतेची सर्वानुमते शिफारस करण्यात आली.** |

सबब, सन २०१७-१८ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९ (छ) नुसार अधिसभेच्या विचारार्थ).

**ठराव:** **प्राचार्या डॉ. श्रीमती के. ए. पांडे यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर डॉ. ए. एन. बारबोले यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) डॉ. ए. एन. बारबोले** **२) श्री. जी. आर. धरणे**

**३) प्रा. डॉ. एम. बी. देशमुख**

**यांनी विचार मांडल्यानंतर सन २०१७ -१८ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालातील आक्षेप व त्याबाबत कार्यालयाने केलेली पूर्तता यावर सविस्तर चर्चा झाली व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून सदर प्रस्ताव दुरुस्तीसह बहुमताने मान्य करण्यात आला.**

**[ ५ ] विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत विकास आराखडा अधिष्ठाता व विद्या परिषद या प्राधिकरणांच्या वतीने केलेली शिफारस मा. कुलगुरू महोदयांनी स्विकारून अधिसभेच्या वतीने स्विकारुन सदरची शिफारस मा. व्यवस्थापन परिषदेस केल्याची बाब अधिसभेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: संदर्भ

१) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.२८ मार्च, २०१८ रोजीचे पत्र.

२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.०४ व ७ एप्रिल, २०१८ रोजीचे पत्र.

३) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. ०३ मे, २०१८ रोजीचे पत्र.

४) ४. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.११ जुलै, २०१८ रोजीचे पत्र.

५) ५. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.२० जुलै, २०१८ रोजीचे पत्र.

महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांचा पंचवार्षिक बृहत विकास आराखडे तयार करण्याचे काम सुरू आहे. या निमित्ताने केंद्र व राज्य शासनाच्या मिशन मोड अंतर्गत उच्च शिक्षणात सर्वांगीण बदल घडवून आणण्याचा संकल्प उच्च व तंत्र शिक्षण विभागाने केला असून त्यानुसार कृती कार्यक्रम केले जात आहे. याबाबत मा. विनोद तावडे, मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी विशेष पुढाकार घेतला आहे व त्या अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे शासनाने पत्रे निर्गमित केलेली आहेत. सदर पत्रे अवलोकनी घेता,

१. या दृष्टीकोनातून विद्यापीठांचा बृहत आराखडा परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, उद्योग विभाग व कौशल्य विभाग या तीन विभागांसह अकृषी सार्वजनिक विद्यापीठांचे कुलगुरू, प्र-कुलगुरू व अधिष्ठाता यांची एक दिवसीय सहविचार सभा बुधवार दि. १८ जुलै, २०१८ रोजी नागपूर येथे आयोजित केली होती.
२. या सहविचार सभेनंतर गुरूवार दि. १९ जुलै, २०१८ रोजी डॉ. के.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बृहत विकास आराखडा समिती समवेत सर्व विद्यापीठांच्या कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिष्ठाते व मा. राज्यपाल महोदयांचे नामनिर्देशित प्रतिनिधी यांची एक दिवसीय सहविचार सभा आयोजित केली होती.
३. या सभेत प्रत्येक विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीकरिता तयार केलेले बृहत विकास आराखड्याचे सादरीकरण करणे अपेक्षित आहे.

विद्यापीठाने उपरोक्त अनु क्र. १ ते ५ अन्वये शासनाने दिलेल्या निर्देशनानुसार

कार्यवाही केली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. आपल्या ही विद्यापीठाचे पंचवार्षिक बृहत विकास आराखडा कच्चा मसुदा तयार करण्याचे काम सुरू आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ पंचवार्षिक बृहत विकास आराखडा कच्चा मसुदा अंतिम करून तो दि. गुरूवार दि. १९ जुलै, २०१८ रोजी डॉ. के. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बृहत विकास आराखडा समिती समवेत एक दिवसीय सहविचार सभेत सादरीकरण केलेला आहे.

विद्यापीठनिहाय बृहत आराखड्यांना आवश्यक दुरूस्त्या करून अंतिम स्वरूप देण्याकरिता दि.२८ व २९ जुलै, २०१८ रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावं येथे सर्व विद्यापीठांच्या प्र-कुलगुरूंची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये शैक्षणिक, संशोधन व विकास या विभागाचे विशेष कार्यासन अधिकारी प्रा. डॉ. व्ही.बी. पाटील यांनी आपल्या विद्यापीठाचा (शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४) पंचवार्षिक बृहत विकास आराखडा मसुदा डॉ. के. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय बृहत विकास आराखडा समिती समोर सादर केला. सदर सभेमध्ये आपल्या विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत विकास आराखडा मसूद्यावर सविस्तर चर्चा होवून सदर राज्यस्तरीय समितीने काही बदल सूचविले आहेत. त्याचप्रमाणे विविध सूचना ही केलेल्या आहेत.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार राज्यस्तरीय बृहत विकास आराखडा समितीने विद्यापीठनिहाय Mentor निश्चित केलेले आहेत. त्यानुसार सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठांना Mentor म्हणून प्रा. जे. डी. यादव, कुलगुरू, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुबई हे निश्चित केलेले आहेत. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठांनी आपला पंचवार्षिक बृहत विकास आराखडा मसुदा अंतिम करण्यापूर्वी आपल्या Mentor यांना दाखवून, त्यांच्याशी विचार विनिमय करून, त्यांनी केलेल्या सूचनांचा अंतर्भाव आपल्या मसूद्यात करूनच आपला पंचवार्षिक बृहत विकास आराखडा विधिवत शासनास दि. ०७ ऑगस्ट, २०१८ पर्यंत सादर करावा असे समितीने सांगितले आहे.

त्यानुसार सदर बैठकीस उपस्थित आपल्या विद्यापीठाचे Mentor प्रा. जे. डी. यादव, कुलगुरू, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुबई यांनी आपल्या विद्यापीठाकरिता

दि.०३ ऑगस्ट, २०१८ ही तारीख निश्चित केलेली आहे. त्यानुसार डॉ. व्ही. पी. उबाळे, प्र. अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, उपकुलसचिव डॉ. एस. एन. कांबळे, कक्ष अधिकारी श्री. सोनकांबळे एस. पी. यांची Mentor प्रा. जे. डी. यादव, कुलगुरू, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई यांच्या सोबत बैठक होवून प्रा. जे. डी. यादव सरांनी सुचविल्या प्रमाणे पंचवार्षिक बृहत विकास आराखडा मसूद्यात दुरूस्त्या करून मसूदा अंतिम करण्यात येवून सदरचा मसूदा दि.०४/०८/२०१८ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम ३६ (१) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता मंडळाने विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ पंचवार्षिक बृहत विकास आराखडा तयार करून तो अंतिम करून शासनाकडे विधिवत पध्दतीने सादर करण्याकरिता अधिष्ठाता मंडळ विद्या परिषदेकडे शिफारस करेल.

विद्या परिषदेद्वारा अधिसभा सदरची शिफारस ही व्यवस्थापन परिषदेस करेल व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने शासनास सादर करावा अशी प्रक्रिया आहे. परंतु शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ हा पंचवार्षिक बृहत विकास आराखडा शासनास दि.०७ ऑगस्ट, २०१८ पर्यंत सादर करावयाचा होता.

दरम्यान या कालावधीत विद्यापरिषद, अधिसभा व व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रस्तावित नसल्याने सदर प्राधिकरणांच्या वतीने मा. कुलगुरू महोदयांनी सदरची शिफारस स्विकारून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याने सदरचा पंचवार्षिक बृहत विकास आराखडा शासनास दि. ०७ ऑगस्ट, २०१८ रोजी सादर करण्यात आलेला आहे. तथापि राज्य शासनाच्या निर्देशानुसार राज्यस्तरीय बृहत विकास आराखडा समितीने विद्यापीठनिहाय बृहत आराखड्यांचा आढावा घेण्याकरिता दि.१५ ऑगस्ट ते २० ऑगस्ट, २०१८ या दरम्यान बैठका आयोजित करुन. त्यानुसार आपल्या विद्यापीठास दि.१५, १८ व १९ ऑगस्ट, २०१८ दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित बैठकीत बृहत आराखड्यात अनेक सुचना व दुरुस्त्या सुचविलेल्या होत्या. त्यानुसार सदर दुरुस्त्या करुन आपल्या विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ हा पंचवार्षिक बृहत विकास आराखडा शासनास दि.२३ ऑगस्ट, २०१८ रोजी विधिवत सादर करण्यात आला. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम ३६ (१) मधील तरतुदीनुसार मधील अधिष्ठाता मंडळाने तयार केलेला पंचवार्षिक बृहत विकास आराखडा मसुद्याची अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विद्या परिषद व अधिसभा या प्राधिकरणांच्या वतीने मा. कुलगुरू महोदयांनी स्विकारून सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या दि.२१/०८/२०१८ रोजीच्या बैठकीत माहितीस्तव ठेवलेली होती.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम ३६ (१) मधील तरतूदीनुसार अधिष्ठाता मंडळाने तयार केलेल्या पंचवार्षिक बृहत विकास आराखडा मसुद्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विद्या परिषद व अधिसभा या प्राधिकरणांच्या वतीने मा. कुलगुरू महोदयांनी स्विकारून सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केली आहे. अधिसभेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची बाब अधिसभेच्या माहितीस्तव).

ठराव: **विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत विकास आराखडा अधिष्ठाता व विद्या परिषद या प्राधिकरणांच्या वतीने केलेली शिफारस मा. कुलगुरुमहोदयांनी स्विकारुन अधिसभेच्या वतीने स्विकारुन सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केल्याच्या बाबीची नोंद घेण्यात आली.**

[ ६ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६ (८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.

(टिपणी: परिनियमानुसार प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र परिनियम क्र.४७६ (७) अन्वये पाठविण्यात येतील).

ठराव: अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी ०३:२० वाजता सुरु झाला व दुपारी ०४:२० वाजता संपला. वेळेअभावी प्रश्न क्र.२१ ते ५४ त्यावरील उपप्रश्न विचारता आले नाहीत.
ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे. (जोडपत्र "अ")

[ ७ ] **अधिसभा सदस्य श्री. एस. टी. सरवदे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"सोलापूर विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन सुरु करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करित आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. टी. जे. फुलारी व डॉ. बी. एन. आदटराव यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ ८ ] **अधिसभा सदस्य श्री. एस. टी. सरवदे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जोपासना होण्यासाठी भारतीय राज्यघटनेचा सरनामा ग्रॅनाईट फरशीवर (५ x १५ फूट) लावणेची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. एस. के. शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ ९ ] **अधिसभा सदस्य श्री. एस. एम. गायकवाड यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

राष्ट्रीय क्रिडा स्पर्धांमध्ये (आंतर विद्यापीठ क्रिडा स्पर्धा) पदक प्राप्त खेळाडूंना सुवर्ण पदक विजेत्यास रु.५०००/-, रजत पदक विजेत्यास रु.४०००/- तसेच कास्यपदक विजेत्यास रु.३०००/- याप्रमाणे रोख स्वरुपात बक्षीस रक्कम देण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेकडे करीत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. टी. जे. फुलारी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ १० ] **अधिसभा सदस्य डॉ. टी. व्ही. शिंदे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"सोलापूर विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवडक १०० विद्यार्थी / विद्यार्थीनींनी व ०५ कार्यक्रम अधिकाऱ्यांनी मा. प्रकाश आमटे यांच्या आनंदवन (हेमलकसा) येथील १० दिवसांच्या शिबिरासाठी दरवर्षी सहभागी व्हावे व त्यासाठी लागणारी रक्कम सोलापूर विद्यापीठाच्या फंडातून करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बी. एन. आदटराव यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ ११ ] **अधिसभा सदस्य डॉ. जी. डी. बिराजदार यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"सोलापूर विद्यापीठात महर्षि दयांनद सरस्वती अध्यासन सुरु करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. एस. एम. गायकवाड यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ १२ ] **अधिसभा सदस्य डॉ. सी. एस. चव्हाण यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

ज्या प्राध्यापकांना संशोधक मार्गदर्शक म्हणून सोलापूर विद्यापीठाने मान्यता दिलेली आहे. त्या मार्गदर्शकांना संशोधक विद्यार्थी विद्यापीठाने द्यावेत असा ठराव ही अधिसभा संशोधन मंडळास करित आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. एम. एस. कदम यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. सी. एस. चव्हाण यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १३ ] अधिसभा सदस्य डॉ. सी. एस. चव्हाण यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठ कक्षेतील सोलापूर शहरातील महाविद्यालयांचे प्रथम वर्षाचे प्रवेश हे ऑनलाईन केंद्रीय पध्दतीने विद्यापीठाने करावेत असा ठराव ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोटी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ १४ ] अधिसभा सदस्य डॉ. सी. एस. चव्हाण यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेशाच्यावेळी अपघात विम्याची रक्कम जमा केली जाते परंतु पूर्व प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतर महाविद्यालयाकडून विद्यार्थी विम्याची रक्कम संबंधित कंपनीकडे जमा केली जाते. दरम्यानच्या काळात काही अपघात झाल्यास महाविद्यालय अडचणीत येते त्यामुळे पैसे विमा कंपनीकडे भरल्यानंतरच विमा संरक्षण सुरु होईल असा नियम करण्यात यावा असा ठराव ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. एस. बी. पाटील यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

[ १५ ] **अधिसभा सदस्या श्रीमती पी. आर. नागणसुरे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"हि अधिसभा विद्यापरिषदेस शिफारस करते कि, आपल्या विद्यापीठात एम. ई. अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पर्यंत प्रवेशित विद्यार्थ्यांना गाईड मिळाले नसल्यामुळे त्या सबंधित विद्यार्थ्यांना विद्यापीठाअंतर्गत इतर महाविद्यालयातील मान्यता प्राप्त गाईड (मार्गदर्शक) घेण्यास परवानगी देण्यात यावी."

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. जी. आर. धरणे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिवांनी जाहीर केले.

सही/-
**कुलसचिव**
**सदस्य सचिव, अधिसभा**

सही/-
**मा. कुलगुरु**
**अध्यक्ष, अधिसभा**

## विषय क्र. ०६ चे सहपत्र

## अधिसभेच्या शनिवार, दि.२९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| डॉ. एस. के. शिंदे | | प्रा. डॉ. जी. एस. कांबळे |
| १ | विद्यापीठामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेनंतर इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे प्रमाण कमालीचे वाढत आहे. याबाबत विद्यापीठ प्रशासन कोणकोणत्या उपाययोजना करणार आहे? | विद्यापीठामार्फत मध्यवर्ती व उप-मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रास मूल्यमापनासंदर्भातील मार्गदर्शक सूचना देण्यात येतात. तसेच सदरच्या सूचना मूल्यमापन केंद्रावर प्रत्येक शिक्षकास देण्यात येतात व त्याचे फलक दर्शनी ठिकाणी लावण्यात येते. |
| | • इथून पुढच्या काळात हे प्रमाण कमी करण्याकरिता उपाय योजना करणार आहेत हे प्रश्न विचारलो होतो त्याचं उत्तर चुकलं आहे? | या संदर्भात आपण भविष्यामध्ये नजीकच्या काळामध्ये आपण कार्यशाळा आयोजित करणार आहे. त्याच्यामध्ये परीक्षकांना, बीओएस चेअरमनला सगळयांना आपण इन्व्हाईट करणार आहे. त्यांना आपण असेसमेंट कस चांगल होईल या संदर्भात आपण उद्बोधन करणार आहे. |
| २ | विद्यापीठाशी सलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांचे कॅस अंतर्गत पदोन्नतीबाबत कॅम्पचे आयोजन कधीपासून केले जाणार आहे? | प्राध्यापकांचे केंद्रीय पध्दतीने स्थान निश्चितीकरिताचे नियमावली तयार करण्याचे काम प्राचार्य डॉ. व्ही. पी. उबाळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु असून दि.२६/०४/२०१८, २७/०६/२०१८ व १३/०७/२०१८ रोजी बैठका संपन्न झाले असून नियमावली तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. दि.०७/०९/२०१८ रोजी सदर नियमावली तयार करण्याकरिता बैठकीचे आयोजन केलेले आहे. तसेच दि.१८ जुलै, २०१८ रोजी युजीसी नोटिफिकेशन प्रसिध्द झाले आहे. सदर नोटिफिकेशनबाबत महाराष्ट्र शासनाने निर्णय निर्गमित झाल्यानंतर शिक्षकांच्या स्थाननिश्चितीची केंद्रीय पध्दतीने कार्यवाही करणेबाबत मा. कुलगुरु महोदयांचे आदेश प्राप्त झाले आहेत. तरी लवकरात लवकर कॅम्पचे आयोजन करण्यात येईल. (सोबत जोडले आहे). (पान क्र. १३ ते १८). |
| | • १८ जुलै, २०१८ ला युजीसीचं राजपत्र प्रसिध्द झालेलं आहे. त्या राजपत्राला राज्य सरकारनं जी. आर. काढलेला आहे काय? | या संदर्भात राज्य सरकारने अद्याप कसलाही जी. आर. काढलेला नाही आणि ज्या वेळेस तो जी. आर. निघेल त्या वेळेस आपण केंद्रीय पध्दतीने स्थान निश्चितीचे जे प्रस्ताव आहेत ते मागवून ते कार्यवाही पूर्ण करणार आहोत. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • या नोटिफिकेशनचा आणि या कमिटीचा काय संबंध आहे काय? | नोटिफिकेशनचा आणि या कमिटीचा काय संबंध नाही. |
| | • इतर विद्यापीठामध्ये जसं ९,०००/- हजाराच्या संदर्भामध्ये जे कॅम्प आहेत किंवा प्रोफेसरचे सुध्दा Centralise पध्दतीने होतात या संदर्भामध्ये आपण काहीच उत्तर दिलेलं नाही? | या संदर्भात परिपत्रक निघालेलं आहे. कालच परिपत्रक काढलेलं आहे, आणि केंद्रीय पध्दतीचे जे काही प्रस्ताव आहेत ते आपण मागवून यासंदर्भात आपण कार्यवाही करणार आहोत. |
| | • ९,०००/- एजीपी १०,०००/- एजीपी या संदर्भात शिवाजी विद्यापीठामध्ये प्रोपेसरचे सुध्दा कॅम्प सुध्दा Centralise पध्दतीने होतात. किंवा इतर सगळया विद्यापीठामध्ये महाराष्ट्रातल्या याबद्दल आपल्या विद्यापीठामध्ये काय आहे? | विद्यापीठामध्ये सुध्दा ग्रेड पे जे ९,०००/- हजार १०,०००/- असतील तर आपण केंद्रीय पध्दतीने घ्यायचं ठरवलं आहे. |
| | • ९,०००/- एजीपी आणि १०,०००/- एजीपी याची जी काय निवड कमिटी किंवा मुलाखत समिती ही एकच आहे, असे असताना संस्थेचे अध्यक्ष किंवा महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन हे त्याचे अध्यक्ष असतात. मग असे कॅम्प विद्यापीठात घेवून तुम्हाला Placement करता येईल का? | Placement करता येणं शक्य आहे. |
| ३ | पुनर्मुल्यांकनासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार करता बहुसंख्य विद्यार्थ्यांचे निकाल बदलेले दिसून येतात. याबाबत परीक्षा विभाग कोणकोणत्या उपाययोजना करीत आहेत? | उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन व पुनर्मूल्यमापन हे पॅनेलमधील प्राध्यापक करीत असतात. याबाबत विद्यापीठामार्फत मध्यवर्ती व उप-मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रास मूल्यमापन संदर्भातील मार्गदर्शक सूचना देण्यात येतात. तसेच सदरच्या सूचना मूल्यमापन केंद्रावर प्रत्येक शिक्षकास देतो व त्याचे फलक दर्शनी ठिकाणी लावण्यात येतात. |
| <u>डॉ. टी. व्ही. शिंदे</u> | | <u>श्रीमती ए. सी. चव्हाण</u> |
| ४ | सोलापूर विद्यापीठ परिसरात पाळणाघर सुरु आहे का? नसल्यास पाळणाघरासाठी खरेदी केलेल्या खेळणीसाठी विद्यापीठाने किती रक्कम खर्च केलेली आहे व खरेदी केलेल्या खेळणीचा काय उपयोग केला जात आहे? | सोलापूर विद्यापीठ परिसरात सध्या पाळणाघर सुरु नाही. पाळणाघरासाठीच्या खेळणीसाठी विद्यापीठाने एकूण रु.५९,३९१/- इतकी रक्कम खर्च केलेली आहे. सद्यस्थितीत कोणत्याही कर्मचाऱ्याच्या पाल्यांचा प्रवेश झालेला नसल्यामूळे तेथे देखरेखीसाठी कर्मचारी नाही. त्यामूळे सदर साहित्य स्टोअर रुममध्ये आहे. |
| | • पाळणाघर विद्यापीठ परिसरामध्ये निर्माण व्हावं अशा प्रकारची कर्मचारी वर्गाकडून मागणी केलेली होती का? | फक्त एकाच कर्मचारी होत्या त्यांनी १ महिन्यासाठी मागणी केलेली असल्यामूळे त्या काळात ते सुरु केलं गेलं, आणि नंतर मग ते सोडून गेले नंतर कुणी मागणीच केली नाही म्हणून तसचं आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • एक महिन्यासाठी का असेना त्या कर्मचाऱ्याच्या पाल्याला त्याची सेवा घेता आली का? | हो घेता आली. |
| | • या पाळणाघराच्या देखरेखीसाठी भविष्य काळामध्ये कर्मचारी नेमणूक आहात काय? | हो. |
| | • मुलं असलेले कर्मचारी इथं राहतात का? | आता तरी अशी कुणाकडून मागणी नाही आहे. पण संबंधितांनी मागणी केल्यास आपण चालू करणार आहोत. |
| | • किती कर्मचारी इथं विद्यापीठ परिसरात राहतात? | बाहेरील काम राहणार असतील ते जर आपल्या बरोबर मुलं घेवून येतील तर इथं राहतील असं काय नाही. |
| | • पाळणाघराच्या इमारतीसाठी आपल्या विद्यापीठाच्या प्रिमायसेस मध्ये कुठल्या इमारतीचं व्यवस्था करण्याचं प्रयोजन आहे? | सोशल सायन्सेस डिपार्टमेंटच्या इथं. |
| ५ | विद्यापीठाच्या कमवा व शिका या योजनेत २०१७-१८ या वर्षात किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे? | सन २०१७-१८ या वर्षात विद्यापीठाच्या कमवा शिका या योजनेत १९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. |
| | • जेवढ्या विद्यार्थ्यांनी मागणी केलेली आहे त्या सर्व विद्यार्थ्यांना कमवा व शिका योजनेमध्ये प्रवेश दिला जातो का? | जेवढ्या विद्यार्थ्यांनी मागणी केलेली आहे असं नाही होत, त्याच्या मध्ये कसं स्क्रूटिनी कमिटी पण आहे. त्यामध्ये गरजू आणि त्यांची थोडीशी मुलाखत घेतली जाते आणि त्याच्या अनुषंगाने त्यांना वाटलं की बरोबर आहे. यांना आपण दिलं पाहिजे तर आपण अशा विद्यार्थ्यांना निवडतो त्याच्यामध्ये. |
| | • गरजूचा क्रायटेरिया काय? | साधारणत: आर्थिक बाब अशी बघतो आपण. |
| | • आपला भाग हा दुष्काळी परिस्थितीमध्ये असल्यामुळं अनेकांची परवड होत असते त्यासाठी सर्व जे मागणी करतील त्यांना विद्यापीठाच्या परिसरातलं काम देवून कमवा व शिका योजनेमध्ये आपल्याला भाग घेता येईल का? | हो घेता येईल. |
| | • म्हणून स्क्रूटिनी कमिटी याच्यासमोर काय क्रायटेरिया असतो का, की हे काम द्यायचा हे काम द्यायचा नाही? | आर्थिक निकष आपण एवढचं बघतो. त्याच्यामध्ये त्याच्याकडं जमीन आहे का, वडिलांची काय स्थिती आहे का किंवा त्याला आता शिक्षणासाठी सध्याचा स्टेटस काय आहे. अशा पध्दतीने थोडी तपासणी केली जाते. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • ज्या विद्यार्थ्यानी मागणी अर्ज केलेला आहे त्या विद्यार्थ्याकडे असलेलं कौशल्य आणि विद्यापीठास आवश्यक मनुष्यबळ या गोष्टीचा विचार तुम्ही करता का? | आहे. कारण आपण सगळ्या या पॅरामिटर्सला घेतलेलं आहे, आणि जे निवड केली आहे. जो प्रश्न विचारलेला आहे तो मागच्या वर्षीचा आहे. त्याच्यात त्यानी जो आकडा सांगितला आहे त्यानुसार केलेला आहे. आणि यांचाच पुढचा प्रश्न या वर्षीचा त्याचाही मध्ये सुधारीत पॅरामिटरर्स तुम्ही जे म्हणता ते टाकलं आहे. एकूण ३८ विद्यार्थी झालेत या वर्षीपण मिळून. |
| | • या योजनेत जे विद्यार्थी भाग घेत आहेत अर्न ॲन्ड लर्न स्किममध्ये यामध्ये कुठल्या प्रकारची कामे देण्यात येतात? | प्रत्येक स्कुल डिमांड करते विद्यार्थ्यांची त्यांच्या-त्यांच्या स्कुलसाठी ही स्कुल जे उपलब्ध काम आहे ते देत. |
| | • या विद्यार्थ्यामध्ये मुलींचे प्रमाण किती आहे आणि त्यांच्यासाठी कमवा व शिका योजनेसाठी काय वेगळं काम आहे का? | मुलींसाठी स्वतंत्र सवलती काही नाहीत. जी मुलांना काम दिली जातात तीच मुलींना काम दिली जातात आणि मुलींचं प्रमाण मुलापेक्षा जास्त आहे. |
| ६ | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षात युवक महोत्सव साजरा करण्यासाठी किती महाविद्यालयाने मागणी केली आहे? | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षात युवक महोत्सव साजरा करण्यासाठी एकाही महाविद्यालयाने मागणी केली नाही. |
| | • आपण कोणत्या महिन्यामध्ये महाविद्यालयामध्ये प्रस्ताव मागणी अर्ज मागविलेले होते? | ऑगस्ट मध्ये मागविलेले होते. |
| | • ऑगस्ट पासून आत्तापर्यंत Youth Festival वेळेत व्हावा म्हणून विद्यापीठानं काय-काय उपाययोजना केली? | युवा महोत्सवाचा निधी वाढवला, प्राचार्यांच्या बैठका घेतल्या. |
| | • युवक महोत्सवाचा प्रश्न हा याच वर्षीचा आहे का गेल्या अनेक वर्षापासूनचा आहे? | अनेक वर्षापासून आहे. यंदा आपण ६ लाख चे १२ लाख म्हणजे आपण १००% याच्यामध्ये वाढ केलेली आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षीपासून अशी परिस्थिती पुढच्या वर्षी येईल असं आता तरी वाटत नाही. पुढच्या वर्षीपासून आपण सुरळीत करण्याचा प्रयत्न करु. |
| <u>डॉ. जी. डी. बिराजदार</u> | | <u>डॉ. एच. के. आवताडे</u> |
| ७ | सोलापूर विद्यापीठासाठी Innova वाहन खरेदी करताना सदरचे वाहन हे ३ किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती पुणे अथवा मुंबई येथे जाण्यासाठी वापरावे असा ठराव व्यवस्थापन परिषदेत झाला आहे का? असे असताना सदरचे वाहन स्थानिक शहरात रोजच वापरले जाते हे खरे आहे काय? | १) सोलापूर विद्यापीठासाठी इनोव्हा वाहन खरेदी करताना सदरचे वाहन हे ३ किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती पुणे, मुंबई तसेच इतर कामाकरिता वापरणेकामी प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. तथापि, असा कोणताही ठराव व्यवस्थापन परिषदेत करण्यात आलेला नाही.<br>२) सदरचा वाहन हा जास्तीत जास्त मुंबई, पुणे तसेच इतर लांब असलेल्या ठिकाणी जाण्याकरिताच वापरण्यात आलेला आहे. सदरचे वाहन स्थानिक शहरामध्ये किरकोळ कामासाठी वापरण्यात येत नसून संवैधानिक अधिकाऱ्यांना कार्यालयामध्ये ने आण करण्याकरिता वापरण्यात येतो. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • वाहन कामाकरिता घेतलेलं आहे का अधिकाऱ्यांकरिता घेतलेलं आहे? | वाहनाच्या जो खरेदीचा जो मुळ ठराव आहे त्याच्यामध्ये आपणाकडं याच्या अगोदर जी वाहनं अवेलेबल होती. ती फक्त ३ ते ४ ड्रायव्हर सोडून बसतील एवढीच होती. त्यामूळे दूरच्या कुठल्याही वाहतूकीच्या संदर्भामध्ये प्रवास करण्यासाठीच हे वाहन ६-७ सीटरचा असावा अशा प्रकारचा मूळ ठराव आहे. |
| | • काम अत्यंत महत्वाचं असलं आणि त्याच्यामध्ये शिपायालाच पाठवावं वाटलं तर काम महत्वाचं असलं तर त्या माणसानी गावात वापरलं काय अडचण आहे का? | विद्यापीठात असला कुठलाही नियम नाही की मा. कुलगुरु महोदयाचं वाहन सोडून बाकी कुठलेही वाहन कुणीही एमरजन्सीला वापरु शकतो. |
| | • सदरचा Innova वाहन कुणी व कोठे वापरावे याची काय नियमावली ठरवली आहे काय? | याची कोणतीही नियमावली नाही. |
| ८ | बी. ए, बी. कॉम व बी. एस्सी भाग - १ अभ्यासक्रमासाठी ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाले नाहीत अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी विद्यापीठाची काही यंत्रणा आहे काय? | नाही. |
| | • मा. कुलगुरुमहोदयांनी शै.२०१८-१९ मध्ये काही महाविद्यालयामध्ये अशा विद्यार्थ्यांची शिफारस केली होती का? | विविध संघटनांची निवेदने प्राप्त झाल्यानंतर मा. कुलगुरुमहोदयांनी काही विद्यार्थ्यांचं वेगवेगळ्या महाविद्यालयामध्ये ॲडमिशन व्हावं यासाठी तशा प्रकारचे निर्देश दिले होते. |
| | • अशा प्रकारची कोणती नियमावली आहे का कुलगुरुंच्या अखत्यारीमध्ये महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याविषयी? | नाही. |
| | • सन्माननीय कुलगुरुंनी या प्रवेशासंदर्भामध्ये काही महाविद्यालयांना त्या ठिकाणी प्रवेश देण्यासंदर्भात सूचना केलेल्या होत्या तर त्या सूचनेचा कोणत्या महाविद्यालयाने अनादर केला आहे का? | वास्तविक पाहता विद्यार्थ्यांच्या अडी अडचणी विचारात घेवून, त्यांच्या गरजा विचारात घेवून विद्यापीठ प्रशासनान असे आदेश दिलेले होते. त्यातील काही महाविद्यालयाने प्रवेश दिलेला आहे काही महाविद्यालयांनी दिलेला नाही. |
| | • अनादर केलेल्या महाविद्यालयांनी किंवा त्या ठिकाणी त्या अधिकाऱ्यावरती प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे काय? | काही कार्यवाही केलेली नाही. |
| ९ | प्राचार्य आर. वाय. पाटील, संचालक, बी. सी. यु डी (२०१५-१७) यांना किती महिन्याचे वेतन व किती रक्कम विद्यापीठ फंडातून अदा करण्यात आले आहे? | प्राचार्य आर. वाय. पाटील, संचालक बी. सी. यु. डी. (२०१५-१७) यांना माहे मे, २०१५ ते जानेवारी, २०१७ या कालावधीचे रु.२,४०,५८९/- (तक्त्याप्रमाणे) विद्यापीठ फंडातून अदा केले आहे. सोबत तक्ता जोडला आहे. (पान क्र.१९). |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • अनुदानित महाविद्यालयातील पात्र व्यक्ती असताना विना अनुदानित व्यक्तीची संचालक म्हणून का नेमणूक केली? | तात्कालीन प्रशासनाचा तो निर्णय होता. |
| | • विना अनुदानित आणि अनुदानित असा भेदभाव शासनाला आणि University ला करता येतो का? | कुलगुरुमहोदय संवैधानिक अधिकारी त्यांचं पेमेंट महाराष्ट्र शासन करतं. या ठिकाणी ग्रॅन्टेबलचीचं माणसं नेमावीत या पध्दतीचा नियम आहे. |
| | • अनुदानित महाविद्यालयातील व्यक्ती नेमला असता तर विद्यापीठाची जी गेलेली रक्कम आहे ती सदरहून रक्कम वाचली असती का? | हो. |
| | • सदरहून रक्कम वाचली असती असं मत असेल तर तसा विद्यापीठ प्रशासनाकडून का प्रयत्न केला नाही? | तात्कालीन प्रशासनाचा तो निर्णय होता. |
| **<u>श्री. ए. एम. शेख</u>** | | **<u>डॉ. बी. पी. रोंगे</u>** |
| १० | माजी कुलगुरु डॉ. नू. न. मालदार यांच्या कार्यकाळातील भरती झालेल्या २६ कर्मचाऱ्यांच्या भरतीस मा. सहसंचालक कार्यालयाने मान्यता दिली आहे का?<br>या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती केली आहे का?<br>नसल्यास या कर्मचाऱ्यांचे वेतन विद्यापीठ फंडातून केले असेल तर आजपर्यंत किती रक्कम वेतनापोटी विद्यापीठ फंडातून अदा करण्यात आली आहे? | १) डॉ. नू. न. मालदार यांच्या कार्यकाळात भरती झालेल्या ३० कर्मचाऱ्यांच्या भरतीस मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर यांनी मान्यता दिलेली नाही. तथापि, मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे जा. क्र. सोविसो / आस्था / २०१७ / ६०७२, दि.२२/०८/२०१८ व जा. क्र. सोविसो / व्हीसी / १०५, दि.२३/०८/२०१८ अन्वये शासनाची मान्यता मिळणेबाबत सर्वकष प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सध्या सदरची बाब शासनाच्या विचाराधीन असून विद्यापीठ याबाबत पाठपुरावा करीत आहे.<br>२) सदर कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती करण्यात आली आहे. परंतु मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर यांनी त्यास मान्यता दिली नाही.<br>३) सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर आजअखेर विद्यापीठ सामान्य निधीतून एकूण रु.१,२६,११,४६३/- (अक्षरी रुपये एक कोटी सव्वीस लाख अकरा हजार चारशे त्रेसष्ट फक्त) इतका खर्च झाला आहे. |
| | • या ३० कर्मचाऱ्यांच्या मान्यतेसाठी विभागीय सहसंचालक कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मान्यता का देत नाही यासाठी पाठपुरावा केला आहे का? | पाठपुरावा चालू आहे, केलेला आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • वेळेत मान्यता मिळाली असती तर विद्यापीठाचे १,२६,११,४६३/- रुपये वाचले असते का? | बरोबर आहे. आता सुध्दा पूर्वलक्षीप्रभावाने मान्यता मिळाली तर आता सुध्दा वाचतील. |
| ११ | सोलापूर विद्यापीठांत या वर्षी नव्याने सुरु केलेल्या M. A. भाषा अभ्यासक्रमास शासनाची मान्यता आहे का? | एम. ए. भाषा अभ्यासक्रमास शासनाची मान्यता नाही. परंतु विद्यापीठाकडून शासनास रितसर प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी भाषा विभाग सुरु करणेसंदर्भात शासनास दि.१८/०९/२०१२ व २३/०५/२०१७ रोजी शिफारस देखील केली आहे. सदर शिफारस पत्रे आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडले आहे. (पान क्र.२० ते २४). |
| | • प्रत्येक कोर्समध्ये किती-किती विद्यार्थ्यांनी ॲडमिशन घेतलेलं आहे? | मराठी विषयासाठी ९ विद्यार्थ्यांनी ॲडमिशन घेतलेलं आहे. |
| | • एका कोर्सला कमीत कमी किती विद्यार्थी असण्याची अट आहे? | अट नाही. जास्तीत जास्त २० विद्यार्थी. |
| | • मागच्या सिनेटच्या मिटिंगमध्ये इतर भाषांची चर्चा झाली होती ते घेतले का नाही? | सुरु होणार आहे. |
| १२ | सोलापूर विद्यापीठातील पदार्थ विज्ञान संकुलाच्या बाजूला असलेल्या मैदानातील सायकल स्टॅन्ड / वाहन निवारा पहिल्याच पावसात भुईसपाट झाला आहे हे खरे आहे काय? असल्यास या सायकल स्टॅन्ड / वाहन निवाऱ्याच्या बांधकामासाठी किती रक्कम खर्च झाली होती? या सायकल स्टॅन्ड / वाहन निवाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची चौकशी केली आहे काय? | सोलापूर विद्यापीठातील पदार्थविज्ञान संकुलाच्या बाजूला असलेल्या मैदानातील सायकल स्टॅन्ड / वाहन निवारा मोठ्या वादळामुळे व पावसामुळे पडलेला आहे. या सायकल स्टॅन्ड / वाहन निवाऱ्याच्या बांधकामासाठी ४,६८,५५०/- रक्कम खर्च झालेली आहे. अद्याप चौकशी केलेली नाही. |
| | • का नाही झाली? आणि कधी होणार? | चौकशीची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. |
| | • चौकशी समिती नेमलेली आहे का या संदर्भात? | अद्याप नाही. |
| | • नेमाला हवी ना पावसाळ्यात उडून जावून बरेच दिवस झालेत आता? | नेमण्यात येईल आता. |
| **<u>श्री. एस. टी. सरवदे</u>** | | **<u>प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे</u>** |
| १३ | सोलापूर विद्यापीठ परिसरातील भू-शास्त्र संकुलातील परीक्षा गोडाऊनचे पत्रे उडून गोडाऊन जलमय झाले व त्यामुळे शेकडो उत्तरपत्रिका भिजल्या हे खरे आहे का? | नाही. उत्तरपत्रिका भिजल्या नाहीत. |
| | • पुढच्या वर्षीला अशा पध्दतीनं पावसामध्ये उत्तरपत्रिका भिजू नये यासाठी विद्यापीठाने काय सुविधा करण्याची उपाययोजना केलेली आहे का? | केलेली आहे. |
| | • काय उपाय योजना केलेली आहे? | पत्रे व्यवस्थित बसवून घेतलेले आहेत. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १४ | शैक्षणिक वर्ष १७-१८ मध्ये अभियांत्रिकी विद्याशाखेत झालेल्या विविध परीक्षेत उत्तरपत्रीकेच्या फेरतपासणीसाठी एकूण किती अर्ज आले होते? | शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये अभियांत्रिकी विद्याशाखेमधील माहे ऑक्टो / नोव्हें २०१७ मध्ये एकूण २६७७ व माहे मार्च / एप्रिल, २०१८ मध्ये एकूण ३०२८ उत्तरपत्रिकेच्या फेर तपासणीसाठी अर्ज प्राप्त झाले आहेत. |
| | • या संदर्भात आलेल्या सर्व प्रश्नासंदर्भात अपत्यामध्ये तपासण्या झाले का, किती तपासण्या केल्या, ४००० विद्यार्थ्यांचं काय करणार ते सांगा? | जे संबंधित प्राध्यापक आम्हांला आढळले आहेत, पुढे आढळणार आहेत. त्यांच्यावर कडक कारवाई होणार. |
| | • या विषयात अशा पध्दतीने उपाययोजना करणार आहात का? यामध्ये पहिला असेसर दुसरा मॉडरेटर आणि तिसरा फोटोकॉपी चिफ मॉडरेटर फोटो कॉपी मागितल्यानंतर तो असेस करणारा, असेस केल्यानंतर दोन्ही मधला डिफरन्स हा टोटलच्या टेन परसेंट पेक्षा जास्त असेल तर त्याच्यावर ॲक्शन घेणार का? | ही व्यवस्था सगळी आहे. |
| | • अशी जर व्यवस्था विद्यापीठाकडे असेल तर अशा प्राध्यापकावर किती प्राध्यापकावर आतापर्यंत कारवाई केली? | मार्च, २०१६ मध्ये २३ प्राध्यापकांवर कार्यवाही केली. २०१६ ला ३१, २०१७ मध्ये १८ आणि नोव्हेंबर, २०१७ मध्ये ७१ असे एकूण १०३ प्राध्यापकावर कारवाई केली. |
| | • २०१७-१८ मध्ये नाही का. | मिटिंग व्हायची आहे असून. |
| | • १०३ प्राध्यापकावर कारवाई केली पण कारवाई कोणत्या स्वरुपाची केली तेही सांगा? | आर्थिक दंडात्मक कारवाई केली. पेपर तपासणीतून त्यांचं नाव वगळण्यात येतं. |
| | • दंडात्मक कारवाई केल्यानंतर दंड किती स्वरुपाचा असेल हा तर मुद्दा आपण गृहित धरणार नाही. पण त्यानंतर जे काही विद्यार्थ्यांचं नुकसान झाले ते भरुन निघणार नाही. पण दंड अशा प्रकारचा करावा की जेणेकरुन त्यांच्या पुढच्या कारकिर्दीमध्ये ते धाकात राहतील की अशा प्रकारची चुक होता कामा नये म्हणून, दंडात्मक कारवाई जर का केली? | तसा Ordinanace तयार करावयाची कार्यवाही सुरु आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १५ | विद्यापीठाने काही कर्मचाऱ्यांना चुकीच्या मार्गाने तात्पुरती पदोन्नती (officiating Promotions) दिली. ती शासनाने नाकारली, ज्यादा दिलेल्या वेतनाची वसुली लावली, त्यातील काही कर्मचाऱ्याकंडून ती वसूल केली, तर काही जणांची वसुली विद्यापीठ फंडातून भरावी असा व्यवस्थापन परिषदेकडे विषय होतो. असा दुजाभाव का? विद्यापीठ फंडाची ही उधळपट्टी नाही का? | १) विद्यापीठ स्थापनेवेळी कर्मचाऱ्यांची संख्या अपूरी असल्याने त्यावेळी लागू असलेल्या प्रमाण संहिता १९८४ च्या कोड नियम ३ (३) (ड) अन्वये सन २००८ ते २०१० या कालावधीमध्ये तात्पुरती पदोन्नती देण्यात आली होती. त्यामुळे सदरची पदोन्नती चुकीची म्हणता येणार नाही.<br>२) सदर तात्पुरत्या पदोन्नतीचा प्रस्ताव शासनास तत्कालिन परिस्थितीमध्ये सादर केला नाही.<br>३) परंतु, तत्कालिन परिस्थितीत संबंधितांच्या सेवा पुस्तकामध्ये त्याची नोंद घेतली गेली असल्याने व त्यास विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर यांची मान्यता घेतली नसल्याने सेवानिवृत्तीच्या वेळी तो प्रश्न उद्भवल्याने गतकालामध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांकडून मा. लेखाधिकारी (उ.शि.) सोलापूर आदेशानुसार वसुली केली आहे.<br>४) तात्पुरती पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांमधून उर्वरित ५ कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीवेळी रक्कम वसुल होवू नये म्हणून प्रशासनास दिलेले विनंती पत्र दि.२१/०८/२०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवले असता, तात्पुरती पदोन्नती दिलेल्या वेतनाची रक्कम विद्यापीठ फंडातून Salary या अंदाजपत्रकीय शिर्षकामध्ये वर्ग करण्यास सर्वानुमते मान्यता दिली आहे. |
| | • काही अधिकाऱ्यांना पदोन्नती दिली होती. त्यांचं तुम्ही रिफंड घेतलं पैसे परत घेतले आणि काही लोकांचं व्यवस्थापन परिषदेने न घेण्याचं मान्य केलेलं आहे. असं असेल तर ज्यांचं घेतलेलं आहे त्याच्यावर तो अन्याय नाही का? म्हणजे काही जणांचे तुम्ही माफ करता आणि काही जणांचं तुम्ही वसुल केलेल्या मग जे वसुल केलेलं आहे ते परत देणार का पैसे? | सिनिअर ऑडिरनी आदेश दिलेत, त्याप्रमाणे ती वसुली केलीत. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • नामदेव कांबळे जेव्हा सेवानिवृत्त अधिकारी होते त्यांच्याकडून ४०,०००/- घेतले आणि त्यासंदर्भात नंतर वलेकर, विजय पाटील, वैभव पवार, सर्जेराव काळे यांनी विद्यापीठाचं सर्व सत्यानाश केलं आणि यांच्या विभागाचं एल. एस. कदम यांच्याकडून का वसुल केली नाही. याला सिनेटची मान्यता आहे का? | यापूर्वी दोन वेळा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर केला होता. पण तो फेटाळण्यात आल्यामूळे आणि ते कर्मचारी इथले जे-जे ज्या-ज्या वेळेला सेवानिवृत्त झाले. त्यावेळेला तेव्हा ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावं लागतं, त्यांच्या पेन्शनसाठी तर त्यांना ती रक्कम भरावी लागली. व्यवस्थापन परिषदेने नामंजूर केल्यामूळे मग ३१ ऑगस्टपर्यंत म्हणजे वलेकर सर त्यात आहेत. ३१ ऑगस्टपर्यंत सेवानिवृत्त झालेत. त्यांनी सगळ्यांनी स्वत: ते पैसे भरलेले आहेत आणि NOC घेवून आणि त्यांचे कागदपत्र सेवानिवृत्त झाल्यानंतर पेन्शनसाठी पाठविली. पण प्रस्ताव हा त्यानंतर व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर केल्यामूळे उर्वरित कर्मचाऱ्यांचं विचार करुन व्यवस्थापन परिषदेने ते मान्य केलं. तो अधिकार त्यांना आहे. |
| | • सिनेटला ठराव करायचा अधिकार नाही का? | सिनेटला बजेट तयार करायचा अधिकार आहे आणि बाकी कर्मचाऱ्यांच्या कल्याण्याच्या ज्या गोष्टी आहेत त्या व्यवस्थापन परिषदेलाच आहे. |
| | • आधीच्या व्यवस्थापन परिषदेने नाकारलेले ठराव या व्यवस्थापन परिषदेने मंजूर केला, त्याचं कारण काय? | कर्मचाऱ्यांनी पुन्हा विचारार्थ असा अर्ज सादर केल्यामुळे तो व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आला आणि त्यांनी मान्यता दिली त्याला. |
| **<u>श्री. ए. बी. संगवे</u>** | | **<u>प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोटी</u>** |
| १६ | सोलापूर विद्यापीठाचा परीक्षा विभाग व पात्रता विभाग यांचा एकमेकात समन्वय असतो असे आम्ही समजतो. विद्यार्थी व महाविद्यालय यांच्या सोयीसाठी पात्रता अर्जाची अतिविलंब मुदत संपल्यानंतर आठ दिवस विद्यार्थ्यांसाठी व नंतर आठ दिवस महाविद्यालयासाठी परीक्षा अर्ज सादर करण्याच्या तारखा ठेवाव्यात असे परीक्षा विभाग का ठरवत नाही? | पात्रता व परीक्षा विभाग यांचा एकमेकात समन्वय असतो. कारण पात्रता विभागाच्या जाहिर केलेल्या तारखा विचारात घेवूनच परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा निश्चित केल्या जातात. परीक्षा अर्जाच्या तारखा जाहिर करताना पात्रतेच्या विना विलंब तारखा विचारात घेवूनच विद्यार्थ्यांसाठी व महाविद्यालयासाठी पूर्वीप्रमाणेच कालावधी देण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार महाविद्यालयांच विनंतीनुसार सदरचा कालावधी वाढवून देण्यात येतो. पात्रता अर्जाची अतिविलंब मुदत संपल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी व महाविद्यालयासाठी परीक्षा अर्ज सादर करावयाच्या तारखा देता देणे शक्य नाही. कारण सत्र पध्दतीचा अवलंब केल्याने परीक्षा विभागास परीक्षा अर्ज प्राप्त झाल्यापासून पुढील कामकाज विहित कालावधीत करणे आवश्यक असते. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • पात्रता अर्जाची अतिविलंब मुदत संपल्यानंतर विद्यार्थ्यासाठी व महाविद्यालयासाठी परीक्षा अर्ज सादर करावयाच्या तारखा देता येणे शक्य होणार नाही असे उत्तर असेल तर महाविद्यालयांनी काम कस करावयाच पात्रता विभागाचं करायचं का परीक्षा विभागाचं करायचं? | या दोन्ही मध्ये समन्वय आहे. दिलेल्या ज्या तारखा विनंती नुसार वेळ वाढवून देण्यात येतो. |
| | • परंतु ही वेळ येवू नये अशी नियोजन का करत नाही पात्रता विभाग व परीक्षा विभाग? | ती वेळ येवू नये अशी नियोजन करणं शक्य नाही. कारण विद्यार्थ्यांच्या ज्या अडचणी असतात. काही विद्यार्थी अडचणींमुळे परीक्षा अर्ज भरु शकत नाहीत आणि ते आलं की आपल्याला त्यांचा अर्ज स्विकारावा लागतो. पात्रतेच्या बाबतीत सुध्दा असं काही घडतं आणि विद्यार्थ्यांचं हित लक्षात घेता, त्याचं नुकसान होवू नये म्हणून काही वेळेस प्रशासनाला ते निर्णय घेवून ते अर्ज स्विकारावे लागतात. |
| १७ | विद्यार्थी व महाविद्यालय यांच्या सोयीसाठी सर्व वर्गाचे परीक्षा अर्ज जनरेट होत नाहीत. तोपर्यंत परीक्षा विभागांनी आपल्या परीक्षा अर्ज भरण्याच्या तारीख जाहीर करु नयेत असे परीक्षा विभाग का ठरवत नाही? | परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा जाहिर केल्यानंतर सर्व वर्गाचे परीक्षा अर्ज त्या त्या तारखेस जनरेट झालेले असतात. |
| | • परीक्षा अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी परीक्षा अर्ज जनरेट करण्यासाठी फॉलोप घेत असतात. हेल्ड बॅक विद्यार्थ्यांचे आपण नंतरही घेतो फॉलोप असे असताना महाविद्यालयाचा डाटा सबमिशन करण्याची तारीख व परीक्षा अर्ज जनरेट होण्याच्या तारखेचे नियोजन परीक्षा विभाग करु शकणार नाही का? | साधारणपणे सिस्टिमला फॉर्म अपडेट झाल्यानंतर २४ तासानंतर Exam चे फॉर्म जनरेट होतात. त्यामूळे फॉलोप काही बाबतीत घेतला असेल काही तांत्रिक अडचणी आल्या असतील. काही वेळेस त्या सिस्टिममध्ये अपडेट केल्यानंतर २४ अवर्सचा वेळ लागतो २४ तासानंतर ते अर्ज जनरेट होत असतं. |
| | • बऱ्याच वेळा त्या ठिकाणी फॉर्म जनरेट होत नाही, त्याच डेट संपत आलेला आहे त्यावेळी त्याठिकाणी संबंधित महाविद्यालयांनी काय करायचं? | टेक्नीकल प्रॉब्लेम येतो त्या-त्या ठिकाणी परीक्षा विभागाकडून वेळ वाढवून दिला जातो आणि याच्यापूर्वी त्याचं वेळ वाढवून दिलेलं आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १८ | सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा शहर व जिल्ह्यातील विविध केंद्रावर होतात. मुक्त व खुल्या वातावरणात परीक्षा होण्यासाठी व कॉपी करण्यास आळा घालण्यासाठी पोलिस बंदोबस्ताची गरज आहे. केवळ मानधन मिळत नाही म्हणून बंदोबस्त मिळत नसेल तर मानधनाबाबत सोलापूर विद्यापीठ विचार करणार आहे की नाही? | सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा निकोप वातावरणात व कॉपी विरहीत होण्यासाठी परीक्षा विभागामार्फत भरारी पथक, Surprise Squad व अंतर्गत दक्षता पथक नेमून कॉपी करण्यास आळा घातला जातो. तसेच पोलीस आयुक्त, सोलापूर शहर व पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांना शहर व जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्ताबाबत प्रत्येक परीक्षेच्या वेळेस कळविण्यात येते. |
| | • पोलिस बंदोबस्त मिळत नसेल तर मानधन बाबत व्यवस्थापन परिषद विचार करणार आहे का नाही? | मानधनाच्या बाबतीत प्रशासन विचार करीत आहे आणि त्याबाबत आपण पोलीस आयुक्तांना पत्रही दिलेलं आहे आणि त्याची ती पुढील प्रक्रिया ती सुरु आहे. |
| | • अशा अतिदक्षता विभाग किंवा परीक्षा केंद्रावरती संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त असावा, विद्यार्थ्यांकडून किंवा परिसरातील लोकांकडून त्याठिकाणी दमबाजी त्याठिकाणी मारहाणही झालेली आहे. अशा घटनांच्या तक्रारीही आहेत. त्यावरती आपण आजपर्यंत काय कारवाई केलेली आहे काय? | अशा प्रकारे तक्रारी विद्यापीठाला प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाने याबाबत पोलिस यंत्रणेकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत. |
| | • तक्रारी दाखल आपण केल्यानंतर सदरहून प्राध्यापकाला किंवा परीक्षकाला जे काही External गेलेले आहेत त्याचं त्या ठिकाणी समाधान किंवा शंकेच निरसन झालेलं आहे काय? | तक्रार असल्यानंतर त्याची कार्यवाही सुरु असणार आहे. समाधान अस काय होतं नाही, कार्यवाही होते. |
| | • परीक्षा विभागाने पोलिस बंदोबस्ताबाबत पोलिस आयुक्तांना पाठविलेल्या पत्राची एक प्रत संबंधित परीक्षा केद्रांना पाठविले जाते काय? | विद्यापीठ जे कळवितं त्याची प्रत संबंधित परीक्षा केद्रांना काय पाठविली जात नाही. तशी मागणी असेल तर करुया आपण तशी व्यवस्था. |
| <u>डॉ. सी. एस. चव्हाण</u> | | <u>प्राचार्य डॉ. ए. बी. शिंगाडे</u> |
| १९ | विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या बदल्या किती वर्षानंतर केल्या जातात? | याबाबत विद्यापीठाचे परिनियम वा अध्यादेश उपलब्ध नाहीत. तथापि, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७ / प्र. क्र.२० / ९७ / बारा, दि.२७/११/१९९७ मधील मुद्दा क्र.२ मध्ये प्रशासकीय कारणास्तव किमान ३ वर्षाचा कालावधी दिला आहे. |
| उपप्रश्न १ | या कालावधीपेक्षा अधिक काळ एकाच विभागात काम करीत असलेल्या कमचाऱ्यांची संख्या किती आहे? | प्रशासनाकडून याबाबत माहिती एकत्रित करण्यात येत आहे. सध्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यासंदर्भात बाब विचाराधिन आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| उपप्रश्न २ | अशा कर्मचाऱ्यांच्या बदल्या ठरलेल्या कालावधीनंतर का करण्यात आलेल्या नाहीत? | प्रशासकीय कारणास्तव. |
| २० | पीएच. डी. संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी पात्रता वेळेत दाखल केली नसल्याने अथवा सिक्स मंथली रिपोर्ट वेळेत सादर केलेले नसल्यास त्याकरिता आकारण्यात येणारा दंड कोणत्या निकशावर आकारला जातो? | पीएच. डी. संशोधन करिता असलेल्या विद्यार्थ्यांनी पात्रता वेळेत दाखल केले नसल्याने दि.२६ मे, २०१० रोजीच्या परिपत्रकान्वये व व्यवस्थापन परिषदेच्या दि.२९ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१३ नुसार दंड आकारण्यात येत आहे.<br>पीएच. डी. सहामाही प्रगती अहवाल वेळेत सादर केलेले नसल्यास त्याकरिता दि.१८ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.२(३) अन्वये दंड आकारण्यात येत आहे. |

सही/
**(सचिव अधिसभा)**
कुलसचिव